नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. १५ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### खंजीर खुपसणारे 'एकत्र'ची भाषा करताय

मुंबई (स. गांवकरी) : महाराष्ट्राच्या आंदोलनात कुठेही नव्हतात. तुम्ही केवळ तोंडाने गोळाफेक करू शकता या पलीकडे तुमची काहीही कुवत नाही. देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यापूर्वी उद्धव ठाकरेंना प्रश्न विचारा की नारायण राणे, कंगना यांचे घरं कोणी तोडली होती? असा सवाल भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला आहे. ऑपरेशन टायगर, लांडगा ही भाषा संजय राऊतांना शोभत नाही, तुम्हाला ऑपरेशन गिधाडची भाषा जमते, तुम्ही लोकांना लुटण्याचे काम केले आहे. नवनाथ बन म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्याकडे भगवा झेंडा उरलेलाच नाही. तुम्ही भगवा झेंडा सोडून काँग्रेसचा झेंडा हाती घेतला आहे. तुम्हाला हिरव्या झेंड्याची जास्त चिंता आहे. परंतू राज ठाकरे हे हिंदुत्ववादी विचारांना मानतात, भगव्या झेंड्याला मानतात. राज ठाकरे तुमच्या हिरव्या झेड्याखाली एकत्र येणार नाहीत. मनपाच्या वेळी तुम्ही त्यांना सोबत घेतले आणि त्यांच्या पाठीमध्ये खंजीर खुपसला. तुमच्यासोबत युती करत मनसेच्या फक्त 6 जागा निवडून येऊ शकल्या. ते एकटे लढले असते तर जास्त जागा त्यांना मिळाल्या असत्या.

## मंत्री गिरीश महाजनांची शिष्टाई फळाला, तीन दिवसानंतर

# रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन मागे



सोलापूर : (स. गांवकरी)

शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे गेल्या तीन दिवसांपासून पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन सुरु होते. आज अखेर त्यांनी तीन दिवसानंतर उपोषण सोडले आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत रोहित पवारांनी उपोषण मागे घेतले. 22 जूनच्या आधी मुंबईत बैठक होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी बोलावल्याची माहिती रोहित पवार यांनी सांगितले. आपल्या मागण्यासंदर्भात सरकार सकारात्मक आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्याचा विचार सरकार करत आहे. या अटीसंदर्भात काय करता येईल यासाठी आपल्याला कमिटीकडे जावे लागेल असे महाजन यांन सांगितल्याचे रोहित पवार म्हणाले.

शेतकऱ्यांच्या वतीने 4 जुलैला मोठे आंदोलन घेणार आहोत असे रोहित पवार म्हणाले. आपली बैठक ठरली आहे. यामध्ये कोणतेही राजकारण नाही. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये ही आमची भूमिका असल्याचे रोहित पवार म्हणाले. यावेळी रोहित पवार यांनी गिरीश महाजन यांचे अभिनंदन केले. कर्जमाफी योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव

### १ रुपयामध्ये जी पिक विमा योजना होती ती पुन्हा सुरु करावी

सरकारला विनंती आहे की, येणारं वर्ष कठीण आहे यंदा पाऊस कमी पडणार आहे. शेतात काही पिकणार नाही. पिके जळून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळं कर्जमाफी योजना अटीशिवाय लागू करणं गरजेचं आहे असे रोहित पवार म्हणाले. त्याचबरोबर 1 रुपयामध्ये जी पिक विमा योजना होती. ती पिक विमा योजना परत सुरु करावी अशी विनंती देखील रोहित पवार यांनी केली आहे.

दिले आहे. मी ज्या मतदारसंघात काम करतो तिथेच अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म झाला आहे. सरकारनं काढलेला जीआर महत्वाचा आहे. सरकारचे अभिनंदन करतो. फक्त या जीआरमध्ये अनेक अटी आहेत. यामुळं अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. 2019 ची कर्जमाफी झाली. त्यामध्ये ज्या शेतकऱ्यांनी लाभ घेतला त्यांना आताच्या या योजनेमध्ये लाभझाला पाहिजे. सरसकट कर्जमाफी करा अशी मागणी आहे. रविकांत तुपकर बुलढाण्यात ते आंदोलन करत आहेत. त्यांना देखील भेटा असे रोहित पवार म्हणाले. रेग्युलर शेतकऱ्यांना 50 हजारांचे लिमिट आहे ते वाढवाले पाहिजे असे रोहित पवार म्हणाले.

कर्जमाफी झाल्यावर रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागण्यासंदर्भात पत्र देणं गरजेचं होते. असे केले असते तर उपोषणाची वेळ आली नसती. काहीतरी मार्ग निघाला असता असे महाजन म्हणाले. जवळपास 37 हजार कोटी रुपयांपर्यंत कर्जमाफी केली जाणार आहे. चर्चा कल्यावर सकारात्मक निर्णय होऊ शकतो. यासाठी चर्चा करावी लागेल असे महाजन म्हणाले. सरकार शेतकऱ्यांसाठी सकारात्मक आहे. शेतकऱ्यांचे ज्यावेळी नुकसान झाले त्यावेळी सरकारनं चांगली मदत केली असल्याचे महाजन म्हणाले. कर्जमाफीमध्ये सुधारणा झाली पाहिजे, असे वाटत असेल तर आपण चर्चा करु. 22 तारखेच्या आत यामध्ये बैठक घेऊ असे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे महाजन म्हणाले. मुख्यमंत्री जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल असे महाजन म्हणाले.

## महिला T20 वर्ल्डकप : भारताने पाकिस्तानला ६४ धावांनी हरवले

बर्मिंगहॅम : (स. गांवकरी)

- दीप्तीने १० धावा देत ५ विकेट घेतल्या, स्मृती मंधानाने केल्या ६८ धावा



महिला टी-२० विश्वचषकात भारताने पाकिस्तानचा ६४ धावांनी पराभव केला. एजबॅस्टन येथे भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि २० षटकांत ६ गडी गमावून १७० धावा केल्या. भारताकडून स्मृती मंधानाने अर्धशतक झळकावले; तिने ४४ चेंडूंत ९ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ६८ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरने ३६ धावांची खेळी केली, तर ऋचा घोषने १७ चेंडूंत ३४ धावा केल्या. पाकिस्तानतर्फे सादिया इक्बाल आणि फातिमा सना यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर तस्मिया रुबाब आणि रामीन शमीम यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. १७१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ १७ षटकांत १०६ धावांत सर्वबाद झाला. मुनीबा अलीने सर्वाधिक ४१ धावा केल्या. भारताकडून दीप्ती शर्माने १० धावांत ५ बळी घेतले; श्री चरणीने ३ बळी घेतले आणि शेफाली वर्माने एक बळी घेतला.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामन्यांमध्ये 'हस्तांदोलन न करण्याची' प्रथा कायम आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ला आणि दोन्ही देशांमधील वाढता तणाव पाहता, भारताच्या पुरुष आणि महिला अशा दोन्ही संघांनी सामन्यांदरम्यान पाकिस्तानशी हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतला. या प्रथेची सुरुवात सप्टेंबर २०२५ मधील आशिया चषकादरम्यान झाली, जेव्हा सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने विजयानंतर पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन केले नाही. ही परंपरा फेब्रुवारी २०२६ मधील पुरुष टी-२० विश्वचषक आणि ऑक्टोबर २०२५ मधील महिला एकदिवसीय विश्वचषकादरम्यानही कायम राहिली. आता बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या महिला टी-२० विश्वचषकाच्या सामन्यात, हरमनप्रीत कौर आणि पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना नाणेफेकीसाठी समोरासमोर आल्या, परंतु त्यांनी हस्तांदोलन केले नाही.

# मुख्यमंत्री फडणवीसांचा मनसेला टोला

मुंबई : (स. गांवकरी)



जैन धर्मगुरू आणि साध्वींच्या सोयीसाठी मुंबईतील विविध रस्त्यांवर मारण्यात आलेल्या 'पांढऱ्या पट्ट्यांवरून' आता राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. दादर पाठोपाठ आता गिरगाव आणि घाटकोपरमध्येही मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत पट्ट्यांवर काळा रंग फासण्यास सुरुवात केली आहे. या वाढत्या वादावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रथमच स्पष्ट शब्दांत भाष्य केले असून, "प्रत्येक गोष्टीला वादात ओढून राजकारण केल्याने कधीच मते मिळत नाहीत," असा सणसणीत टोला त्यांनी मनसेला लगावला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतील वर्सोवा ते भाईंदर नॉर्थ कोस्टल रोडची पाहणी केली. यावेळी माध्यमांशी संवाद साधला असता, सदर वादावर आपली भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "कोणत्याही राजकीय फायद्यासाठी दोन समाजांना एकमेकांसमोर उभे करणे आणि त्यांच्यात तेढ निर्माण करणे पूर्णपणे चुकीचे आहे." "एखाद्या समाजाची एखादी परंपरा असेल, तर ती परंपरा त्यांनी सांभाळली पाहिजे आणि इतर समाजानेही त्यांच्या परंपरेचा आदर राखला पाहिजे. त्याचप्रमाणे, ज्यांची ती परंपरा आहे, त्यांनी इतर समाजाला त्रास होणार नाही याची काळजी घेत त्यांचा आदर केला पाहिजे. आपल्या संस्कृतीत एकमेकांचा आदर करणे हेच सर्वांत महत्त्वाचे आहे," असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दादरमध्ये घेतलेल्या आक्रमक भूमिकेवर नाव न घेता निशाणा साधताना फडणवीस म्हणाले, "विनाकारण प्रत्येक गोष्टीला वादात ढकलून त्यामध्ये राजकारण ओतल्याने कुणाचाही फायदा होत नाही, आणि त्यातून कधीच मतेही मिळत नाहीत. अनेक जण केवळ चर्चेत राहण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी करत असतात. त्यांच्या अशा प्रत्येक गोष्टीला मी बोललंच पाहिजे आणि प्रतिक्रिया दिलीच पाहिजे, असे अजिबात नाही." जैन समाजातील धर्मगुरू आणि साध्वी नेहमी अनवाणी पायांनी पायी प्रवास करतात. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने डांबरी रस्त्यावरून चालताना त्यांच्या पायाला चटके बसून त्रास होऊ नये, यासाठी घाटकोपर, दादर आणि दक्षिण मुंबईतील रस्त्यांवर या पांढऱ्या पट्ट्या रंगवण्यात आल्याचा दावा जैन समाजातील काही सदस्यांनी केला आहे. घाटकोपर-विद्याविहार परिसरातील कैलास अव्हेन्यू सोसायटीमध्ये जैन धर्मगुरूंच्या आगमनासाठी रंगवलेल्या पांढऱ्या पट्टीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या वादाला तोंड फुटले.




# पिकप गाडी विहिरीत कोसळून ८ मृत्यू

### मृतांच्या वारसांना सरकारकडून ५ लाखांची मदत



सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर येथील माळशिरस येथे पिकअप गाडी विहिरीत कोसळून 8 जणांचा, तर 6 जण गंभीर जखमी असल्याची माहिती समोर आली आहे. रस्त्याच्या बाजूलाच ही विहीर होती आणि या विहिरीत पिकप गाडी कोसळून यात 8 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हा अपघात घडल्यानंतर आजूबाजूचे लोक जमा झाले असून ही गाडी विहीरीच्या बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. म्हसवड-पंढरपूर मार्गावर तांदुळवाडीजवळ हा भीषण अपघात झाला. या घटनेवर मुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे. तसेच या घटनेतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून 5 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची गोषणा देखील त्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी येथे एक वाहन खाजगी शेतातील विहिरीत पडल्याने झालेल्या अपघातात काही भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. सुदैवाने 7 जणांचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. त्यांच्यावर उपचार केले जात आहेत.जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक दोघेही तातडीने घटनास्थळी रवाना झाले आहेत आणि स्थानिक प्रशासनाशी आम्ही सातत्याने संपर्कात आहोत, अशी माहिती त्यांनी दिली आहे. म्हसवड-पंढरपूर मार्गावरून सिद्धनाथांच्या दर्शनासाठी गेलेल्या भाविकांवर काळाने घाला घातला आहे. सिद्धनाथांचं दर्शन करून गावाकडे परताना माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी गावानजीक एका विहिरीत पिकप गाडी कोसळली. गाडी कोसळून भीषण अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मृतांमध्ये महिला, लहान मुलांचा देखील समावेश आहे. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना म्हटले की, खूपच दुर्दैवी अशी घटना आहे. मी देखील या संदर्भात माहिती घेत आहे. एवढ्या लोकांचा मृत्यू होत आहे आणि त्यातून अजून गोष्टी स्पष्ट झालेल्या नाहीत. पण आम्ही या संदर्भात माहिती घेत आहोत आणि मदत पोहोचवत आहोत. पुढे बोलताना जयकुमार गोरे म्हणाले, विहीरीची माहिती देखील घेतली जाणार आहे. विहिरीला कठडा आहे की नाही तसेच जर नसेलच तर मग त्यावर कारवाई केली जाईल. रस्त्याच्या बाजूलाच विहीर आहे, तर त्याला कठडा असणे बंधनकारक आहे. पण जर कठडा नसेल तर चौकशी होईल आणि कारवाई होईल.



**प्रथमत: सन्मा.नामदार डॉ.राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील साहेब, मंत्री जलसंपदा, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अहिल्यानगर जिल्हा यांस वाढदिवस तथा अभिष्टचिंतन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !**

# जलसंवर्धनातून समृद्धीकडे नेणारा आधारवड !



## श्री. संतोष देविदास कोकणे
### एम.ए.बी.एड (राज्यशास्त्र) निळवंडे धरणाचे

सन्मा.नामदार साहेबांनी आपल्या राजकीय, सामाजिक कारकीर्दीत विविध पदे भूषविली व त्या सर्वच पदांचा गोरगरीब, शोषित, वंचीत आदि सर्वच घटकांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने यथायोग्य प्रयत्न केले हे सर्वांना ज्ञात आहेच, राजकारण व समाजकारण यामध्ये सुमध्य साधत पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील व स्वर्गीय पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या विचारांचा वसा व वारसा अविरतपणे पुढे घेऊन जात जनतेशी एक परोकाराचे नाते वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न ते सातत्याने करत आहेत. त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत एक विकासाचा उतुंग असा विशाल पर्वत उभा केलेला आहे. सामाजीक जीवनात व राजकारणात भूषविलेल्या सर्वच पदावर काम करताना एक लोकाभिमुख वृत्तीतून नवनवीन आव्हानात्मक निर्णय त्यांनी घेतले व ते यशस्वी देखील केले. त्याचेच एक धोतक म्हणून अलिकडेच मराठा आरक्षणाचा तिढा साहेबांच्या पुढाकारातून यशस्वीरित्या मार्गी लागला ही सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री म्हणून काम करताना जलसंपदा विभागास देशात अव्वल स्थान मिळवून देण्यात साहेबांचे कृतिशिल योगदान राहिले. जलसंपदा विभागाची धुरा सांभाळताना अनेक धोरणात्मक व लोकाभिमुख निर्णयांची अमलबजावनी करत नवनविन जलस्त्रोत निर्माण करून दुरदृष्टीतून महाराष्ट्र दुष्काळमुक्त कसा होवू शकेल यासाठी राज्य व केंद्र सरकारच्या मासध्यमातून विविध योजनांची पायाभरणी याद्वारे करत आहेत. शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून साहेबांची ख्याती सर्वदूर पोहचली आहे. गेली अनेक दशके बहुचर्चित निळवंडे धरण व कालव्यांचा प्रलंबीत प्रश्नांबाबत साहेबांनी स्वतः पुढाकर घेत वेळोवेळी पाठपुरावा करून अनेक वर्षांपासून रखडलेले कालव्यांचे प्रश्न साहेबांच्या पुढाकाराने मार्गे लागले. वर्षानुवर्ष पाण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या अगदी चातक पक्षाप्रमाणे पण्याची आस लावून बसलेल्या अवघ्या जगाचा पोशिंदा मायबाप शेतकऱ्याला एक सुखद ओलावा या निमित्ताने याची देही याची डोळा पहावयास मिळाला. खरंतर निळवंडे धरणाच्या व कालव्याच्या प्रश्नाबाबत साहेबांनी वेळोवेळी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न असेल कालवा ग्रस्तांचे प्रश्न असेल आदि बाबत धोरणात्मक भूमिका घेतली. दुष्काळी भागाला वरदान ठरणाऱ्या निळवंडे धरणाच्या कालव्यांच्या बाबतीत केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या स्तरावर साहेबांनी वेळोवेळी पाठपुरावा करून निधीची उपलब्धता करून दिल्याने सदर विषयी मार्गी लागले.

पाणी हे जीवन आहे त्याचा वापर योग्य व काटकसरीने करणे काळाची गरज आहे. खरतच पाण्याविणा जीवनाची कल्पनाच करणे चुकीचे ठरेल. सन्मा.नामदार साहेब यांचे माध्यमातून मोठया प्रमाणावर शासनाच्या जनकल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे कार्य सातत्याने होत असताना दिसत आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, स्वंयरोजगार, व्यवसाय, शेती, सहकार, सिंचन, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आदि क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल साहेबांना वेळोवेळी गौरविण्यात आलेले आहे. सन्मा. खासदार डॉक्टर सुजय दादा विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे राष्ट्रीय वयोश्री योजनेच्या माध्यमातून साठ वर्षावरील नागरिकांना मोफत सहाय्यक साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात येवून जवळपास 40 ते 45 हजार लाभार्थ्यांची नोंदणी करून सदर लाभार्थ्यांना मोफत सहायक साधने वाटप करण्यात आली. हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम साहेब व दादा यांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हाभर राबविण्यात आला. याचे प्रत्यक्ष दर्शनी साक्षीदार म्हणून व एक त्याद्वारे सेवा करण्याची संधी या निमित्ताने आम्हाला मिळाली हे आमचे परम भाग्य आहे. सन्माननीय साहेबांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी होत आहे शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवून त्याद्वारे जनतेला न्याय मिळवून देत त्यांच्यामध्ये एक नवी उमेद, व चैतन्य निर्माण करण्याचे कार्य जनसेवा फौंडेशनच्या माध्यमातून सातत्याने व निरंतर सुरू आहे. राखावे बहुतांचे अंतरे (मन) भाग्य येते तद्वंतरे या उक्तीप्रमाणे साहेबांनी अनेकांचे मने राखत आपल्या सुस्वभावाने एक वेगळी छबी निर्माण केलेली आहे. सतत कार्यमग्नता व नाविन्याचा ध्यास घेणारे सृजनशिल व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झालेली आहे राजकारण व समाजकारण यामध्ये समन्वय साधत सुख व दुःख यात फारकत न करता संघटनेतील कार्यकर्ता असो वा राजकारणा पडलीकडील मैत्री असो यामध्ये सुखद व दुःखद कार्यक्रमात सहज समरस होत आहेत.

थोडक्यात "मार्ग दाऊनी गेले आधी । दयानिधी संत ते ॥ तेणेचिं पंथे चालो जाता । न पडे गुंता कोठे काही ॥ या संत वचनाप्रमाणे थोर महापुरूषांनी अथवा साधुसंतांनी दाखवून दिलेल्या सद् विवेक, सदाचार, सद्भावना या मार्गाचा यथायोग्य अवलंब करत अखंड जनसेवेचा वसा अंगीकारून त्याद्वारे आपल्या कार्यकर्तुत्वातून सामांन्य जनतेचे सेवाव्रत स्विकारले आहे. निश्चयाचा महामेरू बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारु श्रीमंत योगी ॥ या उक्तीचा आपल्या एकुण जीवनप्रवासात अंतर्भाव करत येणार प्रत्येक पाऊल विकासात्मक व लोककल्याणासाठी समर्पीत करणाऱ्या लोकनेत्यास अभिष्टचींतन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा ! आपणांस उत्तम आर्युआरोग्य लाभो हीच साई चरणी प्रार्थना ! पुनश्चः साहेबांच्या लोककल्याणकारी अविरत प्रवासास माझ्या मनःपुर्वक हार्दिक शुभेच्छा !



# पूजनीय गगनगिरी महाराज आमचे राम : ढोक महाराज
## सप्ताहातून लोककल्याणाची उज्ज्वल परंपरा अधिक बळकट होईल

- प. पू. गगनगिरी बाबा या युगातील चमत्कार
- रामभक्ती, लोककल्याण, समाजसेवा आध्यात्मिक उन्नतीचा सुंदर संगम
- गुंजाळवाडीत रामायण अवतरल्याची अनुभूती
- दीड लाख भाविकांची अलोट गर्दीने परिसर फुलला



संगमनेर : (स. गांवकरी)

रामभक्ती, तपश्चर्या आणि ईश्वरनिष्ठेचे महत्त्व विशद करतांना पूजनीय गगनगिरी महाराज आमचे राम आहेत. गगनगिरी बाबा हे या युगातील आत्मिक आणि आध्यात्मिक चमत्कार आहेत,असे गौरवोद्गार काढत त्यांनी रामकथेला एका वेगळ्या उंचीवर नेले.

स्व जयवंतराव व श्री बाळासाहेब गुंजाळ यांच्या गुंजाळ मळ्यात सुरू असलेल्या परमपूज्य स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहात रामायणाचार्य ढोक महाराज यांच्या भावस्पर्शी वाणीतून रामकथेचे निरूपण होत असून संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला आहे. रामकथेतील शबरी, जटायू, संपाती, हनुमान आणि विभीषण यांच्या प्रसंगांचे निरूपण करताना ढोक महाराजांनी भक्ती, त्याग, सेवा आणि समर्पण यांचा जीवनाशी संबंध जोडला. शबरीच्या अखंड भक्तीचे वर्णन करताना त्यांनी मातंग ऋषींच्या आशीर्वादाने प्रभू रामांच्या प्रतीक्षेत संपूर्ण आयुष्य व्यतीत करणाऱ्या शबरीचे चरित्र उलगडले. शबरीकडे पात्र नव्हते, वैभव नव्हते, पण प्रभूंचे चरण धुण्याची पात्रता तिच्या अंत:करणात होती. शबरी ही केवळ एक भक्त नव्हती, तर तिच्यात कौशल्या मातेचे वात्सल्य दडलेले होते असे सांगत त्यांनी भक्तीचे खरे स्वरूप स्पष्ट केले. "मेरी झोपडी के भाग आज खुल जाएंगे, राम आएंगे" या भावगीताच्या ओळींनी कथासागरात भाविक डुंबून जातांना वातावरण भारावून गेले. संपाती आणि जटायू यांच्या त्यागमय प्रसंगाचे वर्णन करताना त्यांनी रामनामाच्या सामर्थ्याचा उल्लेख केला. प्रभू श्रीरामांच्या कार्याशी संबंध आल्यावर संपातीच्या पंखात आणि जीवनातच पुन्हा चैतन्य निर्माण झाले. दिव्य दृष्टी प्राप्त असलेला संपाती सामर्थ होय. रामनामाच्या स्मरणाने प्रत्येकाच्या जीवनात चैतन्य जागृत होते आणि रामकृपा हीच खरी नवसंजीवनी आहे, असा संदेश ढोक महाराजांनी दिला. पुढे लंकेच्या प्रवेशद्वारावरील लंकिनी राक्षसी, अशोकवाटिकेतील सीतामातेची अवस्था आणि हनुमंतांच्या पराक्रमाचे प्रभावी वर्णन करत त्यांनी धर्माच्या विजयाची महती सांगितली. रामकथेत अयोध्याकांडाचे महत्त्व विशद करताना ढोक महाराज म्हणाले, एका भावाला भावाचे दर्शन नाही, तर दुसऱ्या भावाला आईचे दर्शन नाही; तरीही धर्म आणि मर्यादा जपणारी ही पात्रे आजच्या समाजासाठी आदर्श आहेत. मोठ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाकडे आणि संस्कारांकडे पाहण्याचा संदेश देत त्यांनी प्रभू श्रीरामांचे चरित्र मानवजातीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. त्यांच्या विश्लेषणात्मक आणि हृदयस्पर्शी निरूपणाने उपस्थित भाविक अक्षरशः भावविभोर झाले.

### विखे पाटलांच्या चार पिढ्या महाराष्ट्राच्या जडणघडणीतील महान संचित : ढोक

कथा निरूपण सुरू असतानाच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार राजाभाऊ वाजे आणि आमदार अमोल खताळ उपस्थित राहून रामकथेचे श्रवण केले. यावेळी ढोक महाराजांनी विखे परिवाराच्या चार पिढ्यांनी जपलेल्या समाजसेवेच्या परंपरेचा गौरव केला. हे केवळ राजकीय घराणे नसून महाराष्ट्राच्या जडणघडणीतील एक महत्त्वाचे काळजीवाहू संचित आहे असे ते म्हणाले. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या लोकाभिमुख, संवेदनशील आणि जनतेच्या सुख दुःखाशी जोडलेल्या नेतृत्वाचे कौतुक करताना लोकांच्या मनात विश्वास निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे ढोक महाराज म्हणाले.

### भारत आध्यात्मिक वैभवाने समृद्ध : दिलीप शिंदे

समाजात धर्मनिष्ठा, संस्कार आणि मूल्यांची जोपासना व्हावी यासाठी साधूसत्ता, लोकसत्ता आणि राजसत्ता यांचा समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. संतांचे मार्गदर्शन, जनतेची सहभागिता आणि शासनकर्त्यांची सकारात्मक इच्छाशक्ती यांचा संगम घडला तर धर्मसत्तेने भारत केवळ प्रगत राष्ट्रच नव्हे तर आध्यात्मिक वैभवाने समृद्ध असे कैवल्यधाम बनेल असा विश्वास दिलीप शिंदे यांनी व्यक्त केला. रामकथेचे आयोजन प. पू. गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले .












































# महाराष्ट्र राज्याचे जलसंधारण मंत्री तथा अहिल्यानगर जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
























# महाराष्ट्र राज्याचे जलसंधारण मंत्री तथा अहिल्यानगर जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!




























हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)




ठाणे : दिवा शहरातील स्टेशन जवळील साबेगाव रोडवरील आंबेडकरी समाजाचा क्रांतीस्तंभ अनधिकृत पार्किंगमध्ये हरवला आहे. सदर ठिकाणी अनधिकृत रिक्षा व चारचाकी गाड्यांचे पार्किंग होत असल्याने आंबेडकरी समाजातील अनेक जेष्ठ नागरिकांनी खेद व्यक्त केला आहे.

**(फोटो - संतोष पडवळ)**

# गिरीश गायकवाड यांच्या वक्तव्याविरोधात वैदू समाजाकडून निषेध

## भटके-विमुक्त समाजाचा संताप : आंदोलन करण्याचा इशारा गायकवाडने भाषा सुधारावी अन्यथा जशास तसे उत्तर देऊ : डॉक्टर स्वामी वैदु

- गायकवाडला भर रस्त्यात चोपून काढू
- गायकवाडने स्वतःची लायकी ओळखावी मग समाजावर आरोप करावे वैदू समाज संघटनेचा सणसणीत इशारा



**मुंबई : (स. गांवकरी)**

भटके-विमुक्त समाजाबाबत कथितरीत्या अपमानास्पद व आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या आरोपावरून गिरीश गायकवाड यांच्या विरोधात भटके-विमुक्त समाजामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप करत मोठ्या संख्येने समाजबांधव, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी या घटनेचा निषेध नोंदविला. गायकवाड याची भाषा सुधारावी अन्यथा वैदू समाज आपली देखील भाषा दाखवून देईल आम्हाला देखील बोलता येते आम्ही या समाजातील शाहू फुले आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते आहोत आम्ही समाजामध्ये वावरत असताना देण्याचे काम करतो घेण्याचे काम करत नाही त्यामुळे गायकवाड यांनी आपली भाषा सुधारावी अन्यथा जशास तसे उत्तर दिले जाईल असा सण समिती शाळा वैदू समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉक्टर स्वामी शिरकुल वैदु यांनी दिला

यावेळी उपस्थितांनी संबंधित व्यक्तीच्या वक्तव्याचा तीव्र निषेध करत अशा प्रकारची भाषा कोणत्याही समाजाबाबत वापरणे अयोग्य असल्याचे स्पष्ट केले. भटके-विमुक्त समाजाचा तसेच वैदू समाजाचा अपमान सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका समाजबांधवांनी मांडली.

समाजातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी एकजूट दाखवत संबंधित व्यक्तीविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. समाजाच्या सन्मानाला धक्का पोहोचविणाऱ्या वक्तव्यांमुळे संपूर्ण समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मुंढवा पोलीस ठाण्यात निवेदन सादर करून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यासह योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी समाजबांधवांनी केली. अन्यायाविरोधात संघटितपणे लढा देण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, या प्रकरणामुळे वैदू समाजासह संपूर्ण भटके-विमुक्त समाजामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून समाजाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचविणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. गायकवाड यांनी माफी न मागितल्यास संपूर्ण राज्यभरात वैदू समाज रस्त्यावर उतरून या घटनेचा त्रिवणी शेतकऱ्याला तरी प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घेऊन गायकवाड याला अटक करावी अशी मागणी अखिल भारतीय वैदू समाज फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर स्वामी शिरकुल वैदू यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे तरी गायकवाडला तातडीने अटक करावी अशी मागणी अखिल भारतीय वैदू समाज फाउंडेशनचे संस्थापक मार्गदर्शक दशरथ हटकर माजी नगरसेवक तथा माजी प्रदेशाध्यक्ष श्यामलिंग शिंदे. साहेबराव पवार. पैलवान अशोक जाधव यांनी केली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## २२ ते २४ जून पर्यंत श्री विठ्ठल मंदिर दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार



सोलापूर (स. गांवकरी) : अखेर दिनांक 22 जून ते 24 जून दरम्यान श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर प्रशासनाने घेतला आहे. रासायनिक पद्धतीने देवांच्या मूर्ती चे लेपन करण्यात येणार आहे त्यामुळे चार दिवस मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून मूर्तीचे लेपन हे रासायनिक पद्धतीनेच होणार आहे. दिनांक 23 आणि 24 जून रोजी श्री विठ्ठल मंदिर सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. भाविकांनी हे दोन दिवस पंढरपूरला येऊ नये, असं आवाहन मंदीर प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. झिजत असलेल्या विठ्ठल मूर्तीची झीज रोखण्यासाठी अखेर 22 ते 24 जून दरम्यान पुरातत्व विभागाकडून विठ्ठल मूर्तीवर लेपन प्रक्रिया होणार असून 23 आणि 24 जून रोजी विठ्ठल मंदिर सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. त्यामुळे देशभरातील भाविक वारकरी आणि पर्यटकांनी 23 व 24 जून रोजी पंढरपूरला येऊ नये असे आवाहन करण्यात आले आहे. विठ्ठल मूर्तीची सातत्याने होत असलेल्या झीड प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर समिती वारकरी सांप्रदाय आणि पुरातत्व विभाग यांची बैठक झाली होती. या बैठकीत देवाच्या मूर्तीला पारंपारिक पद्धतीने लेपन करायचे की रासायनिक पद्धतीने यावरून बराच घामासान झालं होता.

## कल्याणशेट्टी पॅटर्न ठरतोय सोलापूर जिल्हाचे राजकीय केंद्रबिंदू




सोलापूर (स. गांवकरी) : अक्कलकोटच्या राजकीय इतिहासात गेल्या दशकभरात झालेला बदल हा केवळ सत्ता परिवर्तनापुरता मर्यादित नसून,संघटनशक्ती,सूक्ष्म नियोजन आणि नव्या नेतृत्वाच्या उदयाचा एक ठळक प्रवास म्हणून पाहिला जातो.पूर्वी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अक्कलकोट तालुक्यात 2019 नंतर राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली आणि भाजपने गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत तसेच महानगर पातळीपर्यंत आपला प्रभाव मजबूत केला. तसे पाहिलं तर एक तरुण शिक्षकाची एन्ट्री तालुका राजकारणात होतो,त्याला पक्षीय संघटनेत पद मिळू नये म्हणून इतर राजकारण्यांनी काळजी घेताना दिसतात परंतु शेवटी जिल्हा सरचिटणीस पदी सचिन कल्याणशेट्टी यांची निवड होतो आणि तिथेच सुरुवात होतो एक राजकीय प्रवासाची... पुढे अक्कलकोट तालुका अध्यक्ष आणि पुढे विधानसभा उमेदवारी बहुमताने निवड,पुन्हा त्यापेक्षा जास्त मताने आमदार पुढे जिल्ह्याच्या प्रत्येक निर्णयात निर्णायक भूमिका मग कल्याणशेट्टी पॅटर्न ची झांजावती सुरुवात अक्कलकोट तालुक्याच्या या बदलाच्या केंद्रस्थानी स्थानिक नेतृत्वाचा प्रभावी उदय दिसून येतो.शिक्षक ते युवक सरपंच अशा प्रवासातून पुढे आलेले सचिन कल्याणशेट्टी यांनी अल्पावधीतच अक्कलकोटच्या राजकीय पटावर आपला ठसा उमटवला. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत झाली असून बूथ पातळीपासून जिल्हा आणि महानगर पातळीपर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे विस्तारले गेले आहे.याच प्रक्रियेत “कल्याणशेट्टी पॅटर्न” ही संकल्पना अधिक ठळक होत गेली असून ती केवळ निवडणूक विजयापुरती मर्यादित न राहता एक प्रभावी राजकीय कार्यशैली म्हणून ओळखली जाऊ लागली आहे.

# रोहित पवारांचे कुटुंबीय झाले भावूक

**सोलापूर : (स. गांवकरी)**



- आईने हात जोडले, पंढरपुरात वडिलांचे हाल पाहून मुलांचे डोळे पाणावले

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार गेल्या तीन दिवसांपासून शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात, या मागणीसाठी अन्नत्याग आंदोलन करत आहेत. वैद्यकीय तपासणीनंतर आज आमदार रोहित पवारांना सलाईन लावायच्या हालचाली डॉक्टरांकडून सुरू करण्यात आल्या. ऑक्सिजन, पल्स रेट, मीटर आणि मॉनिटरही लावण्यात जाणार होते.

रोहित पवार यांच्यासाठी सर्व वैद्यकीय सुविधेसह डॉक्टरांची टीम सज्ज होती. मात्र, रोहित पवार यांनी सलाईन लावण्यास नकार दिला. ब्लड प्रेशर आणि राज्यातील साखर ड्रॉप होत असल्याने डॉक्टरांचा सलाईन घेण्याचा रोहित पवाराना देण्यात आला होता सल्ला. रोहित पवार यांच्यासाठी सर्व वैद्यकीय सुविधेसह डॉक्टरांची टीम सज्ज होती. मात्र, रोहित पवार यांनी सलाईन लावण्यास नकार दिला. रोहित पवार यांच्या आंदोलनास नेतेमंडळी, कार्यकर्ते, आमदार,खासदार भेट देत आहेत. तर, विरोधकांकडून आंदोलनाची खिल्ली उडवली जात आहे. रोहित पवारांचे संपूर्ण कुटुंबीय आज आंदोलनस्थळी दिसून आले, लेकरा-बाळांसह आई-वडिलही आंदोलनस्थळी भावूक झाल्याचं पाहायला मिळाले. गेले तीन दिवसापासून अन्नत्याग आंदोलनाला बसलेल्या आपल्या मुलाच्या भेटीला आई सुनंदा पवार आज पोहोचल्या, त्यावेळी मुलाकडे पाहून अतिशय भावुक झाल्या. मला रोहितचा खूप अभिमान आहे, घरात काहीच कमी नसताना शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी त्याच्या तळमळीतून मोठं आंदोलने होत आहे, गेले तीन दिवसांपासून त्याच्या पोटात अन्नाचा कण न घेता शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी तो शासनाशी लढत आहे, असेही सुनंदा पवार यांनी म्हटलं. आमदार रोहित पवार यांच्या पत्नी, मुलगी-मुलगी आणि आई-वडिल देखील आंदोलनस्थळी लोकांमध्ये बसून होते.

# कोकण विभागीय आयुक्तांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला विविध योजनांचा आढावा

**ठाणे : (स. गांवकरी)**



शासन व प्रशासन सर्वसामान्यांच्या सर्वांनी विकासासाठी कटिबद्ध आहे. त्या दृष्टीने ठाणे जिल्ह्यातही शहरी व ग्रामीण भागात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विविध विकासकामे प्रगतीपथावर आहेत. या विकासकामांचा तसेच महसूल विभागाच्या नियमित कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आज कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयास भेट दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात ही बैठक संपन्न झाली. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या आढाव्याबरोबरच विभागीय आयुक्त श्रीमती अग्रवाल यांनी विशेष शासकीय प्रकल्पासाठी लागणारी जमीन आणि भूसंपादन स्थिती, शासकीय जमीन, ग्राम भेटी या विषयांचाही सविस्तर आढावा घेतला. त्याबरोबरच विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR), जनगणना व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प कामकाजाबाबतचाही आढावा त्यांनी घेतला. या कामांमध्ये येत असलेल्या अडचणी त्यांनी यावेळी जाणून घेतल्या तसेच या विशेष मोहिमा विहित वेळेत पूर्ण करण्याविषयी संबंधितांना सूचना दिल्या. या बैठकीत विभागीय आयुक्त श्रीमती अग्रवाल यांनी शहापूर तालुक्यातील चोंढे खुर्द या गावात झालेल्या घोंगडी बैठकीचा आवर्जून उल्लेख केला आणि या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

लोकाभिमुख प्रशासनासाठी अशा प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी राबविणे, ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्यासह अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, विभागीय आयुक्त कार्यालयाचे सह आयुक्त विजयकुमार म्हसाळ, विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त डॉ. सागर घोलप, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, ठाणे नगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्यासह उपजिल्हाधिकारी रूपाली भालके, सर्जेराव मस्के-पाटील, वरुणकुमार सहारे, शशिकांत गायकवाड, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, अमित सानप, विजयानंद शर्मा, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील, जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले, तहसिलदार रेवण लेंभे, सचिन चौधर, प्रदीप कुडाळ, उमेश पाटील, निलेश गौड, अमित पुरी, अभिजीत देशमुख, अभिजित खोले, विकास गारुडकर, परमेश्वर कासुळे, मीनल दळवी, जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी, महानगरपालिकांचे उपायुक्त यांची उपस्थिती होती.

# आदिवासी पारधी समाजाचे राजेश काळे यांची निर्दोष मुक्तता

**सोलापूर (स. गांवकरी)**



आदिवासी पारधी समाजाच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे आदिवासी पारधी समाज संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा सोलापूर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर राजेश काळे यांची तब्बल १२ वर्षे चाललेल्या न्यायालयीन खटल्यानंतर अखेर निर्दोष मुक्तता झाली आहे. या निर्णयामुळे आदिवासी समाजामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. सन २०१२ मध्ये जिल्हा परिषद निवडणुकीतील कुंभारी गटामध्ये अनुसूचित जमाती (एसटी) महिला पद राखीव होते. या निवडणुकीत आदिवासी पारधी समाज संघर्ष समितीने लक्ष्मी गंगाधर चव्हाण यांना उमेदवारी दिली होती. निवडणुकीत त्यांचा अल्प मतांनी पराभव झाला. त्यानंतर प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या जात पडताळणीबाबत गंभीर शंका उपस्थित करण्यात आल्या होत्या.

या संदर्भात आदिवासी पारधी समाज संघर्ष समितीच्या वतीने औरंगाबाद येथील अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तक्रार दाखल करण्यात आली. मात्र तक्रारीवर वेळेत निर्णय न घेणे, टाळाटाळ करणे आणि तक्रारदारांशी असहकार्याची भूमिका घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. याच प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन उपआयुक्त श्रीनिवास प्रभाकर कर्वे यांनी राजेश काळे यांच्या विरोधात विविध आरोपांखाली गुन्हे दाखल केले होते. सरकारी कामात अडथळा आणणे, दमदाटी करणे, शिवीगाळ करणे आदी आरोपांवरून त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात आली. या प्रकरणात सेशन न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्यांना औरंगाबाद खंडपीठातून जामीन घ्यावा लागला होता. गेली १२ वर्षे हा खटला न्यायालयात सुरू होता. अखेर न्यायालयाने उपलब्ध पुरावे आणि साक्षींचा विचार करून राजेश काळे यांची निर्दोष मुक्तता केली. या निर्णयामुळे सत्याचा विजय झाल्याची भावना त्यांच्या समर्थकांनी व्यक्त केली आहे. या खटल्यामध्ये ॲड. कन्हैया सुभाष शर्मा, ॲड. कैलास एस. जाधव आणि ॲड. विधी हसमुख कोठारी यांनी प्रभावीपणे बाजू मांडून न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. निर्दोष मुक्ततेनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना राजेश काळे म्हणाले, "आदिवासी, पारधी आणि वंचित समाजाच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करताना अनेक अडचणी, खोटे आरोप आणि न्यायालयीन लढाया सहन कराव्या लागतात. मात्र सत्याच्या बाजूने उभे राहणाऱ्यांनी कधीही खचून जाऊ नये. न्याय मिळण्यास वेळ लागू शकतो, पण शेवटी न्याय मिळतोच. ही दोषमुक्ती माझी वैयक्तिक नसून संपूर्ण आदिवासी पारधी समाजाच्या संघर्षाची आणि सत्याची विजयगाथा आहे."

> आदिवासी पारधी समाज संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी या निर्णयाचे स्वागत करत न्यायालयाचे आभार मानले आहेत. तसेच समाजाच्या हक्कांसाठी सुरू असलेला लढा यापुढेही अधिक ताकदीने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.
>
> **– राजेश काळे**
> **संस्थापक अध्यक्ष,**
> **आदिवासी पारधी समाज संघर्ष समिती**
> **माजी उपमहापौर,**
> **सोलापूर महानगरपालिका**

# पोलीस हवालदारपदी सुरेश पवार यांची पदोन्नती

**कनाशी : (स. गांवकरी)**



अभोना पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी सुरेश पवार यांची पोलीस हवालदारपदी पदोन्नती झाली. या पदोन्नतीबद्दल अभोना पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे व सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरोळे यांच्या हस्ते सुरेश पवार यांना हवालदार पदाचा बॅच लावून गौरवण्यात आले. यावेळी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन पवार यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सुरेश पवार यांनी पोलीस दलात आजवर अत्यंत प्रामाणिकपणे व कर्तव्यनिष्ठेने सेवा बजावली आहे. गुन्हे तपास, कायदा-सुव्यवस्था व जनतेशी सौहार्दाचे संबंध ठेवण्यात त्यांचा नेहमी पुढाकार राहिला आहे. त्यांच्या या कामाची दखल घेत वरिष्ठांनी त्यांना पदोन्नती दिली. कठोर परिश्रम, शिस्त आणि समर्पण याचे फळ म्हणजे ही पदोन्नती. पवार यांच्या यशाचा आम्हाला अभिमान आहे,” असे गौरवोद्गार सपोनि योगिता कोकाटे यांनी काढले. सपोनि शिरोळे यांनीही पवार यांचे कौतुक करून जनतेच्या सेवेसाठी असेच कार्यरत राहण्याच्या सूचना दिल्या. सत्काराला उत्तर देताना हवालदार सुरेश पवार म्हणाले, “वरिष्ठांनी दाखवलेल्या विश्वासाला मी पात्र ठरेन.

# शिवरत्नची क्रेझ आणि धाक आज ही कायम टिकून

**सोलापूर : (स. गांवकरी)**



राज्याच्या राजकारणात शिवरत्न ची क्रेझ आणि धाक आज ही कायम टिकून आहे. एखाद्या माणसाची भीती किती असते बघा सध्या सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषदेची निवडणूक होत आहे

सोलापूर जिल्ह्याचे सध्या राजकीय गणित बघितलं तर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराचा विजय हा निश्चितपणे विजय होऊ शकतो

या निवडणुकीचे मतदार महानगरपालिकेचे नगरसेवक जिल्हा परिषदेचे सदस्य पंचायत समितीचे सभापती नगरपालिका नगरपंचायत आणि नगर परिषदेचे नगरसेवक यांना या निवडणुकीत मतदानाचा अधिकार असतो

सध्या सोलापूर महानगरपालिका हे भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आहे व जिल्हा परिषद देखील त्यांच्याकडेच आहे व बार्शी अक्कलकोट मंगळवेढा पंढरपूर सांगोला कुर्डूवाडी मोहोळ मैंदर्गी व दुधनी या सर्व नगरपरिषदांवर भारतीय जनता पक्षाची व महायुतीची सत्ता आहे फक्त एकच नगरपरिषद ती म्हणजे अकलूजची ती एकमेव नगरपरिषद शिवरत्नच्या ताब्यात आहे. एवढा सगळा एकतर्फी विजय दिसत असताना सुद्धा आज भारतीय जनता पक्षाने राष्ट्रवादी शरद पवार साहेब गटाचे जवळपास तीन आमदारांना आपल्या गळाला लावले म्हणजे एवढं सगळं असूनही भारतीय जनता पक्षाला सोलापूर मध्ये आपला विधान परिषद आमदार होईल याची शाश्वती नाही. याच्यावरून एकच कळतं की जगातला सगळ्यात मोठा पक्ष शिवरत्न ला घाबरतोय म्हणून तर सगळ्या स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात असताना सुद्धा यांना विरोधी पक्षातले आमदार फोडावे लागत असतील तर विचार करा शिवरत्न ची ताकद किती असेल ताकद आणि किती असेल क्रेझ जिल्ह्याच्याच नव्हे तर राज्याच्या राजकारणात मोहिते पाटील यांचा कायम दबदबा आणि वचक राहिलेला आहे. सध्या संपूर्ण सोलापूर जिल्हा भाजपच्या हातात असतानाही केवळ एक माणूस त्यांना नडतोय ते म्हणजे मोहिते पाटील आणि त्यांचा शिवरत्न बंगला, याच शिवरत्न वरून सध्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी राजकारण खेळले जात आहे.

# लोहा तालुक्यात १३४३ शेतकऱ्यांना बियाणे वाटप सुरू

**लोहा : (स. गांवकरी)**



लोहा राष्ट्रीय खाद्यतेल अभियान २०२६-२७ अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार निवड झालेल्या १३४३ शेतकऱ्यांना लोहा तालुक्यात प्रमाणित बियाणे वाटपाची प्रक्रिया सुरळीत सुरू झाली आहे.

तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबवली जात आहे. तालुक्यातील पाच हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर बियाण्यासाठी अर्ज केले होते. यापैकी १३४३ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. महाबीज आणि कृषक भारती सहकारी संस्थेच्या माध्यमातून सार्थक कृषी केंद्र लोहा, बारको कृषी केंद्र लोहा, शेतकरी बीज भांडार लोहा आणि न्यू बालाजी कृषी केंद्र मारतळा या चार केंद्रांवर बियाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे. आतापर्यंत ५७७ क्विंटल प्रमाणित बियाणे वितरित करण्यात आले असून, सुमारे ७५० शेतकऱ्यांना मोफत बियाणे मिळाले आहेत. पुढील आठवड्यात आणखी १५० क्विंटल बियाणे उपलब्ध होणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे यांनी दिली. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या यादी तालुका कृषी कार्यालयाच्या वार्तांफलकावर लावण्यात आल्या आहेत. प्रक्रिया पारदर्शक व्हावी यासाठी कासराळे स्वतः कृषी केंद्रांना भेट देत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत. श्रीमती स्वाती टेळे (गुण नियंत्रक अधिकारी), लक्ष्मण हंडे व विजय काकडे (सहायक कृषी अधिकारी) यांच्या टीमसोबत ही मोहीम यशस्वीपणे राबवली जात आहे. “महाडीबीटी पोर्टलवर प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार ५ हजारांहून अधिक अर्जांमधून १३४३ शेतकऱ्यांची निवड केली आहे. आतापर्यंत ५७७ क्विंटल बियाणे वितरित झाले असून, पुढील आठवड्यात आणखी १५० क्विंटल उपलब्ध होईल. शेतकऱ्यांनी बियाण्याचा पुरेपूर वापर करून आधुनिक खते, पाणी व्यवस्थापन आणि कीड नियंत्रण तंत्राचा अवलंब करावा. केवळ बियाणे मिळवणे पुरेसे नाही, तर त्याची पूर्ण क्षमता वापरून उत्पादन वाढवणे हे खरे आव्हान आहे,” असे आवाहन प्रशांत कासराळे यांनी केले.

या मोहिमेमुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे वेळेवर मिळून उत्पादन वाढीसह उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.

> “महाडीबीटी पोर्टलवर प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार आम्ही ५ हजारांहून अधिक अर्जांमधून १३४३ शेतकऱ्यांची निवड केली आहे. आतापर्यंत ५७७ क्विंटल प्रमाणित बियाणे वितरित झाले असून, पुढील आठवड्यात आणखी १५० क्विंटल उपलब्ध होईल. शेतकऱ्यांनी या बियाणांचा पुरेपूर वापर करून आधुनिक खते, पाणी व्यवस्थापन आणि कीड नियंत्रण तंत्राचा अवलंब करावा. केवळ बियाणे मिळवणे पुरेसे नाही, तर त्याची पूर्ण क्षमता वापरून उत्पादन वाढवणे हे खरे आव्हान आहे. आम्ही स्वतः कृषी केंद्रांवर भेट देऊन प्रक्रिया सुरळीत करत आहोत. सर्व शेतकऱ्यांनी वेळेत बियाणे घेऊन खरीप हंगाम यशस्वी करावा,”
>
> **- प्रशांत कासराळे, तालुका कृषी अधिकारी, लोहा.**

# थोडक्यात पण महत्वाचे



## अवैध धंदे बंद करा, जनआंदोलन छेडू : पोलीस ठाण्यात निवेदन

तामसा (स. गांवकरी) : तामसा शहरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अवैध मटका व्यवसायावर तात्काळ कारवाई करून हे अवैध धंदे बंद करण्यात यावेत, अन्यथा जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देणारे निवेदन तामसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, तामसा शहरात अवैध मटका व्यवसाय खुलेआम सुरू असून त्यामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत आहे. विशेषतः गरीब व मजूर वर्गातील नागरिक या व्यसनाच्या आहारी जात असून त्यांच्या संसारावर विपरीत परिणाम होत आहे. अनेकजण कर्जबाजारी होत असून कुटुंबीयांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. यापूर्वीही संबंधित अवैध व्यवसायाबाबत तक्रारी करण्यात आल्या असतानाही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने तातडीने चौकशी करून शहरातील सर्व अवैध मटका केंद्रांवर धडक कारवाई करावी व हा व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी करण्यात आली.

## हेडगेवार चौकात झेब्रा क्रॉसिंगच्या कामास प्रारंभ; पाठपुराव्याला यश

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव शहरातील अत्यंत वर्दळीच्या डॉ. हेडगेवार चौकात वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने झेब्रा क्रॉसिंगच्या कामास अखेर सुरुवात करण्यात आली आहे.भा ग मोरे कै. बळवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघ तालुका अध्यक्ष नायगाव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाने याची दखल घेत पावले उचलल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. कै. बळवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भाऊराव मोरे यांनी दि. ८ रोजी नांदेडचे जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून नायगाव येथील डॉ. हेडगेवार चौकात वाढत्या वाहतूक कोंडीसह अपघातांचा धोका लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची भा. ग.मोरे यांनी मागणी केली होती. या निवेदनात चौकात झेब्रा क्रॉसिंग, ट्रॅफिक सिग्नल, लाईट सुरू इंडिकेटर, रंबलिंग स्ट्रिप्स तसेच वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. दरम्यान, गेल्या महिन्यात या चौकातील मोठमोठे खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. त्यानंतर वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कामे अपेक्षित होती. काही यांत्रिक अडचणींमुळे झेब्रा क्रॉसिंगच्या कामाला विलंब झाला असला, तरी अखेर संबंधित यंत्रणेकडून या कामास प्रारंभ करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार : बालाजी बच्चेवार

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील पिक विम्यापासून वंचित राहिलेल्या महसूल मंडळांतील शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विम्याची रक्कम येत्या आठ दिवसांत जमा होण्याची शक्यता असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्याचा दावा भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य बालाजी बच्चेवार यांनी केला आहे. पिक विम्याच्या प्रश्नासंदर्भात बच्चेवार यांनी सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी संपर्क साधून शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित प्रश्न येत्या आठवडाभरात निकाली काढण्याचे आश्वासन दिल्याचे बच्चेवार यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्यासह नायगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक शेतकरी अद्याप पिक विम्याच्या रकमेपासून वंचित आहेत. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पेरणीची लगबग सुरू असताना ही रक्कम मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता संयम बाळगावा, असे आवाहनही बालाजी बच्चेवार यांनी केले आहे. यावर्षी पिक विम्याचा प्रश्न जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी गंभीर ठरला असून, अनेकांनी विविध स्तरांवर पाठपुरावा केला आहे. या पार्श्वभूमीवर बच्चेवार यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आल्यास हजारो शेतकऱ्यांचा प्रलंबित प्रश्न निकाली निघण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील वंचित राहिलेल्या महसूल मंडळांतील शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विम्याची रक्कम येत्या आठ दिवसांत जमा होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे. शेतकऱ्यांनी चिंता करू नये."

## निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या व्दिवार्षीक निवडणूक-2026 ची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी दिले. जिल्हा नियोजन भवन येथे या निवडणुकीच्या मतदान व मतमोजणीच्या अनुषंगाने आयोजित दुसऱ्या प्रशिक्षणात त्या बोलत होत्या. प्रशिक्षणाला जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले, अप्पर जिल्हाधिकारी रत्नदिप गायकवाड, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध कक्षाचे नोडल अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक कामांबाबत मतदारांची कोणतीही तक्रार येणार नाही यासाठी आपण दक्ष राहिले पाहिजे. आपल्याकडे निवडणूक कामांचा मोठा अनुभव असला तरी अतिआत्मविश्वास न बाळगता निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेत आपल्या हातून कोणतीही चूक होणार नाही याची संपूर्ण दक्षता सर्वांनी घ्यावी. निवडणूक कर्तव्य बजावतांना समाज माध्यमाचा वापर अत्यंत काळजीपूर्वक व जबाबदारीने करावा, अशी सूचना निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी केली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक पार पाडण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. मतदान व मतमोजणी केंद्रावर सुरक्षेच्यादृष्टिने सर्वांनी खबरदारी घ्यावी, असे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदिप गायकवाड यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांवर मार्गदर्शन केले तर उपविभागीय अधिकारी प्रविण मेंगशेट्टी यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. योग्य पद्धतीने मतपेटी हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण यावेळी देण्यात आले. या निवडणुकीचे मतदान गुरुवार 18 जून 2026 रोजी संबंधित महसूल उपविभागाच्या मुख्यालयी असलेल्या तहसिल कार्यालयात होणार असून या मतदानाची मोजणी सोमवार 22 जून 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हा नियोजन भवन येथे होणार आहे.

# आईच्या कष्टाला लेकाची साथ



- उपजिल्हाधिकारी विलास नरवटे यांनी जपली मातीतील संस्कृती
- "आईसोबत दगडी जात्यावर धान्य दळताना दिसला संस्कारांचा वारसा
- "उपजिल्हाधिकारी विलास नरवटे यांच्या साधेपणाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा"

लोहा : (स. गांवकरी)

लोहा उच्च पदावर विराजमान झाल्यानंतर अनेकदा व्यक्ती आपल्या मुळांपासून आणि मातीपासून दूर जात असल्याचे चित्र दिसते. मात्र, याला पूर्णपणे अपवाद ठरले आहेत लोहा-कंधारचे कार्यक्षम उपजिल्हाधिकारी विलास नरवटे. प्रशासकीय कामाचा व्याप आणि जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत असतानाच, आपल्या ६० वर्षीय मातोश्री कलावती बळीराम नरवटे यांना घरगुती कामात मदत करत त्यांनी माणुसकीचे आणि संस्कारांचे दर्शन घडविले आहे. आईसोबत पारंपरिक पद्धतीने दगडी जात्यावर धान्य दळतानाचा त्यांचा साधेपणा सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून लोहा आणि कंधार तालुक्याचे उपजिल्हाधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यापासून विलास नरवटे यांनी आपल्या कामाचा एक वेगळा 'धडाका' लावला आहे. केवळ कार्यालयात बसून काम न करता, प्रत्यक्ष ग्रामीण भागात जाऊन युवक आणि कष्टकरी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यावर त्यांचा विशेष भर असतो. सर्वसामान्यांच्या समस्या प्राधान्याने ऐकून त्या तातडीने मार्गी लावण्याच्या त्यांच्या कार्यपद्धतीमुळे अल्पावधीतच त्यांनी प्रशासकीय यंत्रणेत आणि लोकांच्या मनात एक विश्वासार्ह अधिकारी म्हणून स्थान निर्माण केले आहे. प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करत असतानाही, ते आपल्या मुळांशी घट्ट जोडलेले आहेत. सुट्टीच्या दिवशी गावी आल्यावर अधिकारीपदाचा कोणताही बडेजाव न ठेवता, ते पुन्हा एक जबाबदार 'मुलगा' बनतात. आई कष्ट करत असताना त्यांना एकटे न सोडता, विलास यांनी स्वतः खाली बसून जात्यावर धान्य दळण्यास मदत केली. ही दृश्ये पाहून ग्रामीण संस्कृतीतील मायेचे प्रतिबिंब सर्वांना पाहायला मिळाले. आजच्या धावपळीच्या युगात, जिथे अनेकजण आपल्या संस्कृतीपासून लांब जात आहेत, तिथे एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने आपला साधेपणा जपल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. "पदाचा अहंकार नसलेला आणि आईवर अफाट प्रेम करणारा मुलगा लाभणे हे आईच्या कष्टाचे फळ आहे," अशा भावना व्यक्त करत आहेत. आई कलावती बळीराम नरवटे यांनी मुलाला दिलेले संस्कार आणि विलास यांनी ते जोपासलेले हे मूल्य आजच्या पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. कर्तव्याची धुरा समर्थपणे सांभाळत असतानाच घरच्या संस्कृतीला आणि आईच्या कष्टाला महत्त्व देणारे विलास नरवटे यांचे हे रूप लोहा-कंधारच्या जनतेसाठी अभिमानास्पद ठरले आहे.

# हदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचा 'सस्पेन्स' वाढला

- गाळे वाटप, नातेवाईकांना लाभ आणि शाळेसाठी जागा भाडेतत्त्वावर दिल्याची चर्चा

तामसा : (स. गांवकरी)

हदगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत तामसा उपबाजार समितीमध्ये गाळे वाटप प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. गाळ्यांचे वाटप अधिकृत पद्धतीने झाले की अनाधिकृतरित्या, याबाबत शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चेनुसार, काही गाळे संचालक मंडळाशी संबंधित नातेवाईक तसेच राजकीय पुढाऱ्यांच्या जवळच्या व्यक्तींना देण्यात आल्याचा आरोप होत आहे. गाळे वाटपासाठी खुली निविदा प्रक्रिया, लिलाव किंवा पारदर्शक निकष अवलंबले गेले होते का, याबाबतची माहिती अद्याप स्पष्टपणे समोर आलेली नाही.

याशिवाय आणखी एक महत्त्वाचा मुद्दा चर्चेत आला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या जागेत एका खाजगी इंग्रजी शाळेला भाडेतत्त्वावर जागा देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. कृषी मालाच्या खरेदी-विक्रीसाठी आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठी असलेल्या बाजार समितीच्या जागेचा शैक्षणिक संस्थेसाठी वापर करण्यास कोणत्या नियमांनुसार परवानगी देण्यात आली, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नियमांनुसार बाजार समितीची मालमत्ता भाडेतत्त्वावर देण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची मंजुरी, ठराव, भाडेकरार आणि महसूल अटी आवश्यक असतात. मात्र संबंधित प्रकरणात सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या होत्या का, याची माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नाही.

दरम्यान, गाळे वाटप, भाडेकरार, बाजार समितीच्या जागेचा वापर आणि आर्थिक व्यवहारांची संपूर्ण माहिती माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविण्याची तयारी काही नागरिकांनी सुरू केली आहे. या प्रकरणातील सत्य परिस्थिती समोर आणण्यासाठी सहकार विभागाने स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

# जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त रॅली




नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त शुक्रवार 12 जून रोजी कामगार विभागामार्फत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ कार्यालय परिसरातून करण्यात आला. सहाय्यक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जनजागृती रॅलीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी कामगार विभागाचे अधिकारी व कर्मचारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे प्रतिनिधी, महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते तसेच इतर संबंधित विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीपूर्वी महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गांवरून जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान विविध आस्थापना, हॉटेल्स, व्यावसायिक प्रतिष्ठाने व मॉल्स यांना भेटी देण्यात आल्या. बालकामगार न ठेवण्याबाबत संबंधित आस्थापनांकडून हमीपत्रे घेण्यात आली तसेच बालकामगार प्रतिबंधक संदेश असलेले स्टिकर्स लावून जनजागृती करण्यात आली.

### दोन अल्पवयीन मुलांची सुटका

अभियानादरम्यान ढवळे कॉर्नर परिसरातील एका हॉटेलमध्ये अल्पवयीन मुलांकडून काम करून घेतले जात असल्याची बाब निदर्शनास आली. त्यानुसार कामगार विभागाने पोलिस विभागाच्या सहकार्याने संयुक्त कारवाई करून संबंधित अल्पवयीन मुलांची सुटका (Rescue) केली. पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

बालकामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारणा अधिनियम 2016 नुसार 14 वर्षांखालील बालकांना कोणत्याही व्यवसायात अथवा प्रक्रियेत कामावर ठेवणे दंडनीय गुन्हा आहे. तसेच 14 ते 18 वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलांना धोकादायक व्यवसायांमध्ये रोजगार देण्यास मनाई आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या नियोक्त्यांवर कारावास व दंडाची तरतूद करण्यात आली आहे. कामगार विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कुठेही बालकामगार आढळून आल्यास त्याची माहिती तात्काळ कामगार विभाग, पोलिस विभाग किंवा संबंधित प्रशासनाला द्यावी. बालकामगारमुक्त समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांनी नमूद केले.

# आपत्ती व्यवस्थापन : मान्सूनपूर्व रंगीत तालीम संपन्न

------ : (स. गांवकरी)

जिल्हा प्राधिकरणच्यावतीने

नांदेड | प्रतिनिधी

मान्सून हंगामाच्या पार्श्वभूमीवर पूरस्थितीत प्रभावी शोध व बचाव कार्य करता यावे, यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्या वतीने काळेश्वर घाट, विष्णुपुरी येथे जिल्हास्तरीय मान्सून-२०२६ पूर्व तयारीची रंगीत तालीम व सराव सत्र उत्साहात संपन्न झाले.



जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

या रंगीत तालीमेत पूरस्थितीमध्ये शोध व बचाव कार्याची पद्धत, आवश्यक पूर्वतयारी, आयआरबी बोट असेंबल करण्याची प्रक्रिया तसेच बचाव कार्यासाठी लागणाऱ्या विविध साहित्याची माहिती आणि त्यांचा प्रत्यक्ष वापर याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांना साहित्य हाताळण्याचा प्रत्यक्ष सरावही करून घेण्यात आला.

प्रशिक्षणासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड-वाघाळा महानगरपालिका अग्निशमन दल, नांदेड पोलिसांचे शीघ्र प्रतिसाद पथक (क्यूआरटी), जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाचे वैद्यकीय पथक आणि तहसील कार्यालय नांदेड यांनी संयुक्त समन्वय साधला.

महानगरपालिकेचे अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे व उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे यांनी आयआरबी बोट असेंबल करण्याची प्रक्रिया आणि पूरस्थितीतील बचाव कार्याचे तांत्रिक पैलू समजावून सांगितले. पोलिस विभागाच्या वतीने उपअधीक्षक शिंदे यांच्या उपस्थितीत पीआय दर्शने व क्यूआरटीचे ज्ञानोबा चोंडे यांनी मागील वर्षीच्या बचाव मोहिमांचे अनुभव आणि कार्यपद्धती विषद केली. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयामार्फत डॉ. सुनील कुलकर्णी व सचिन कोताकोंडावार यांनी सीपीआरचे महत्त्व सांगत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगदीश कांबळे व डॉ. प्रवीण मुंडे यांनी मान्सून काळातील आरोग्यविषयक दक्षता, पाणी शुद्धीकरण, पूरानंतरची काळजी आणि गर्भवती महिलांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी मागील वर्षीच्या यशस्वी शोध व बचाव कार्याबद्दल सर्व संबंधित यंत्रणांचे कौतुक केले. यंदाच्या मान्सूनसाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि प्रशिक्षित पद्धतीने सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

तहसीलदार विठ्ठल परळीकर व तहसीलदार संजय वारकड यांनीही मागील वर्षीच्या पुरस्थितीतील अनुभव मांडत यंदाच्या मान्सूनसाठी पूर्ण तयारी ठेवण्याचे आवाहन केले.

# कार्य तत्परतेमुळे पॉलिओग्रस्त अपंग बालकाला मिळाले जीवदान

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा येथील तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या कार्य तत्परतेमुळे नेवासा शहर मध्यमेश्वरनगर प्रभागातील पॉलिओग्रस्त सूरज लालचंद डोंगरे या सात वर्षीय अपंग बालकाला जीवदान मिळाले आहे.जमिनीवर सरपटत चालणारा हा बालक उपचारानंतर चालू लागला आहे, याबद्दल तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांचा बालकांच्या मातापित्यांनी सत्कार करून त्यांचे आभार मानले असून या बालकाला तहसीलदार यांनी डोल सुरू केल्याने मोठा आधार ही मिळाला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की मोलमजुरी कामाच्या निमित्ताने लालचंद डोंगरे व सौ.पुष्पा डोंगरे हे दाम्पत्य हे पुणे परिसरात आपली उपजीविका करत होते त्यांचा सात वर्गीय पॉलिओग्रस्त मुलगा नेवासा येथे आजीकडे रहात असल्याने शिधा पत्रिकेत नाव नसल्याने सूरज यास पुढील उपचार घेता येत नव्हते ही बाब पत्रकार सुधीर चव्हाण यांनी तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांच्या कानावर घातली तेव्हा त्यांनी लगेचच सुरजचे आजीच्या शिधापत्रिकेत नाव समाविष्ट केले व वैद्यकीय सेवा मोफत मिळावी म्हणून लगेचच पत्र उपलब्ध करून दिले त्यामुळे लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये सूरजवर सुमारे दोन महिने मोफत उपचार करण्यात आले. आतापर्यंत जमिनीवर सरपटत जीवन जगत असलेल्या सूरजला उपचार घेत असतांना त्याच्या वडिलांनी घेतलेल्या सरावामुळे तो उभे राहून पाऊले टाकू लागला. याचे श्रेय सूरजच्या आईवडीलांनी तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांना दिले.आमची परिस्थिती हलाखीची असल्याने आम्हाला उपचार करणे शक्य नव्हते मात्र ते तहसीलदार डॉ.बिरादार साहेबांमुळे शक्य झाले असल्याचे सूरजचे वडील लालचंद डोंगरे यांनी सांगितले.

# बोरीवली ग्रामपंचायत निवडणूक : आरक्षण सोडत जाहीर

## १३ सदस्यपदांपैकी ७ जागा महिलांसाठी राखीव; निवडणुकीच्या राजकीय समीकरणांना वेग

भिवंडी : (स. गांवकरी)

ठाणे जिल्ह्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी सदस्यपदांच्या आरक्षण सोडतीची प्रक्रिया पार पडली. याच अनुषंगाने भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत ग्रामपंचायत कार्यालयात विशेष ग्रामसभेद्वारे जाहीर करण्यात आली. या सोडतीमुळे गावातील निवडणुकीची राजकीय गणिते स्पष्ट होण्यास सुरुवात झाली असून इच्छुक उमेदवारांनी तयारीला वेग दिला आहे. यावेळी केंद्रप्रमुख तथा



अध्यासी अधिकारी श्यामसुंदर दोंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष ग्रामसभेत चिठ्ठी पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी पडघा ग्राम महसूल अधिकारी विजय लोहकरे, बोरीवली ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव, सरपंच, विद्यमान सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोडतीनुसार प्रभाग क्रमांक १ मध्ये एकूण ३ जागा असून त्यापैकी १ जागा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गासाठी तर २ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. प्रभाग क्रमांक २ मध्ये एकूण २ जागा असून त्यामध्ये १ जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) महिला प्रवर्गासाठी तर १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक ३ मध्ये एकूण २ जागा असून त्यापैकी १ जागा अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी आणि १ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक ४ मध्ये एकूण ३ जागा असून त्यामध्ये १ जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी), १ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आणि १ जागा सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक ५ मध्ये एकूण ३ जागा असून त्यामध्ये १ जागा ओबीसी महिला प्रवर्गासाठी, १ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आणि १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव करण्यात आली आहे. बोरीवली ग्रामपंचायतीच्या एकूण १३ सदस्यपदांपैकी ७ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ओबीसी महिला प्रवर्गासाठी २ जागा, सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी ४ जागा तसेच अनुसूचित प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षणाचा लाभ लागू होणार आहे. याशिवाय अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गासाठी स्वतंत्र आरक्षण राखण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाची ५० टक्के मर्यादा काटेकोरपणे पाळण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर गावातील विविध राजकीय गटांनी संभाव्य उमेदवारांच्या चाचपणीला सुरुवात केली असून आगामी निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आरक्षण जाहीर झाल्याने अनेक इच्छुकांचे राजकीय समीकरण बदलले असून काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे बोरीवली ग्रामपंचायत निवडणुकीची रंगत आतापासूनच वाढू लागली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेजच्या वतीने वारकऱ्यांची दंत चिकित्सा

नेवासा (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेजच्या वतीने वद्य एकादशीचे औचित्य साधून नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात घेतलेल्या दंत चिकित्सा शिबिरात शेकडो वारकऱ्यांची मोफत दंत चिकित्सा व मौखिक आरोग्य विषयक जनजागृती डॉ.कीर्ती आंधळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी झालेल्या शिबीर प्रसंगी दर्शनासाठी आलेल्या वारकरी भाविकांना मौखिक आरोग्याच्या समस्या बाबत प्रबोधन करण्यात आले.दंत समस्या असलेल्या गरजूंना पुढील दंतविषयक उपचारांकरीता अहिल्यानगर येथील श्री. यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय येथे येण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.तंदुरूस्त दातांसाठी योग्य पद्धतीने दातांची निगा राखण्यासाठी आवश्यक ती माहिती देऊन त्यांना मोफत टुथब्रश आणि टुथपेस्ट चे वाटप करण्यात आले. डॉ.कीर्ती आंधळकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या दंत तपासणी शिबिरात समृद्धी आंबेडकर, सच्चिदानंद आंधळे,वेदांत अंधुरे,क्षितिज बनकर,मानसी भंडारी,प्रज्ञा भराटे,वैष्णवी भोजने,भावना भोसले,जुई ढोले,पायल डिसले,सानिका चहाड,सौ. सुनिता दातीर यांनी सहभाग नोंदवून मोलाची कामगिरी बजावली. वारकऱ्यांची मोफत दंत चिकित्सा करून मार्गदर्शन केल्याबद्दल संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख मार्गदर्शक वेदांताचार्य हभप श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे,कृष्णाभाऊ पिसोटे,कैलास जाधव,जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे यांनी यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेजच्या टीमला धन्यवाद देत आभार मानले.



## "सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका" पुरस्काराने सुरेखा घोलप यांचा गौरव

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य आयोजित प्रथम राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात व्ही के हायस्कूल, पनवेल जि.रायगड येथे पार पडला. या कार्यक्रमात नगर जिल्ह्यातून सुरेखा घोलप-भुकन यांना 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका' पुरस्काराने गौरवण्यात आले.याप्रसंगी स्वागतोत्सुक व मार्गदर्शक अनिल नाचपल्ले, स्वागताध्यक्ष माजी शिक्षक आमदार(कोकण विभाग) बाळाराम पाटील तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. सुरेखा घोलप या सावित्री शक्तीपीठ च्या अध्यक्षा असून ज्ञानसरिता माध्यमिक विद्यालयात मराठी अध्यापनाचे कार्य करीत असून नुकताच १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात घोलप यांचा 'अंतरी' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. अभिवाचन, वृत्तनिवेदक, सूत्रसंचालिका नाट्य, लेखन-दिग्दर्शन, एकांकिका, शॉर्टफिल्म्स, काव्यवाचन याशिवाय साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रमात विविध पुरस्कार प्राप्त आहेत.यापूर्वी उत्कृष्ट अध्यापन पुरस्कार तसेच उमेद फाउंडेशनचा शैक्षणिक कार्य गौरव पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराच्या निमित्ताने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




## पेमराज सारडा महाविद्यालयाचा मयंक पाखरे सायकलिंग स्पर्धेत प्रथम

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नुकत्याच पेमराज सारडा महाविद्यालय मध्ये सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया,खेलो इंडिया, अंतर्गत वर्ल्ड सायकल डे निमित्त राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेचे विविध गटांमध्ये आयोजन केले होते. या सायकलिंग स्पर्धेसाठी विविध जिल्ह्यांतून नामांकित खेळाडू नी सहभाग घेतला होता. त्यामध्ये पेमराज सारडा महाविद्यालयाचा मयंक पाखरे या खेळाडूने अटीतटीच्या सामन्यात शेवटच्या टप्प्यात मुसंडी मारुन प्रथम क्रमांक पटकावला.तसेच १७वर्ष वयोगटातील प्रथम क्रमांक-अनुष्का मिसाळ, द्वितीय क्रमांक -गौरी कुल्लाळ, तृतीय क्रमांक-निशा फंड, १९ वर्ष वयोगटातील प्रथम क्रमांक -भाग्यश्री पालवे, द्वितीय क्रमांक -फौजिया शेख आदींनी स्पर्धेत यश मिळविले आहे. विजेते स्पर्धकांना तोफखाना पोलीस स्टेशन चे पी.आय.जगदीश भांबळ यांच्या हस्ते रोख रक्कम व चषक देऊन खेळाडूंचा गौरव करण्यात आला. विजेते खेळाडूंचे अभिनंदन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा,डॉ.पारस कोठारी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,अँड.अनंत फडणीस, डॉ.रमेश झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, प्रा.ज्योती कुलकर्णी, अनंत देसाई, प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे,पर्यवेक्षक प्रा.सुजित कुमावत आदींनी विजेते खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. सर्व खेळाडूंना क्रिडा संचालक तथा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे सचिव प्रा.संजय साठे, प्रा.संजय धोपावकर,संजय शिंदे,संभाजी मोहिते,प्रा. साईनाथ थोरात आदींनी मार्गदर्शन केले.

## मान्सूनचं आगमन; महाराष्ट्रात धो-धो पाऊस, पंजाबराव डख यांचा अंदाज

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यात मान्सूनचं आगमन झालं आहे. मात्र तरी देखील संपूर्ण महाराष्ट्र अजूनही मान्सूनने व्यापलेला नाहीये. येत्या १५ जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होईल असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. सध्या स्थितीमध्ये राज्यातील काही भागांमध्ये पाऊस सुरू आहे, तर काही भागांमध्ये अजूनही पाऊस झालाच नाहीये. शेतकऱ्यांचे डोळे मान्सूनच्या पावसाकडे लागले आहेत. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी पेरण्यांचा खोळंबा झाला आहे. दरम्यान पुढील १५ दिवसांमध्ये पावसाचं प्रमाण कसं असेल? कोणत्या भागांमध्ये पाऊस होईल याचा अंदाज हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला आहे, परंतु तरी देखील अजूनही अनेक भागांमध्ये पाऊस झालेलाच नाहीये. मान्सूनच्या पावसाला ब्रेक लागल्याचं पहायला मिळत आहे.

### प्रवरासंगम येथे लोकवर्गणीतून उभारण्यात आलेल्या

# स्मशानभूमीचे कॉ. बाबा आरगडे यांच्या हस्ते लोकार्पण

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील टोका-प्रवरासंगम जायकवाडी धरणग्रस्त गावच्या लोकवर्गणीतून उभारण्यात आलेल्या स्मशानभूमीचे व अंत्यविधी रथाचे लोकार्पण अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कॉ. बाबा आरगडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते बी के चव्हाण यांनी लोकवर्गणी गोळा करून परिश्रमातून सर्व सुविधा उपलब्ध असलेली व सुशोभीकरण केलेली स्मशानभूमी नूतनीकरण निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला होता. प्रवरासंगम येथील गोदावरी नदीच्या तीरावर ही स्मशानभूमी उभारण्यात आली असून या आधी या स्मशानभूमीची अवस्था बिकट होती सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून



सदरचे काम लोकसहभागातून करण्यात आल्याने आदर्शवत असे कार्य याठिकाणी झाले,स्मशानभूमी लोकार्पण कार्यक्रमात शव रथाचे ही लोकार्पण करण्यात आले.लोकार्पण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरासंगम गावच्या सरपंच सौ.अर्चनाताई सुडके हया होत्या.

कॉम्रेड बाबा आरगडे, टोका सरपंच सौ.डावखर ग्रामपंचायत सदस्या सौ गवळी,खेडले माजी सरपंच सौ. निर्मलाताई ढगे,जेष्ठ शिक्षक रामदास कोरडे उपस्थित होते.याप्रसंगी कॉम्रेड बाबा आरगडे,डॉक्टर अशोकराव ढगे,युवा नेते राजेंद्र कदम यांनी या सामाजिक कार्याचे आपल्या भाषणातून प्रशंसा केली. यावेळी सौ.आशाबाई चव्हाण व बी के चव्हाण यांच्या लग्नाचा वाढदिवस स्मशानभूमीत साजरा करून अंधश्रद्धेला छेद देण्यात आला.

याप्रसंगी स्मशानभूमी उभारणीसाठी काम करणाऱ्या कारागिरांचा तसेच दानशूर वर्गणीदार दात्यांचा टोका प्रवरासंगम येथील सरपंच उपसरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात आला

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते बी के चव्हाण यांनी प्रामाणिकपणे काम करून ही समाजातील विक्षिप्त लोक टीका करतात याबद्दल खेद व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब शिंदे गुरुजी यांनी केले.यावेळी

चव्हाण दाम्पत्याने लग्नाच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त अंत्यविधी रथ गावाला भेट दिला व याच स्मशानभूमीमध्ये केक कापून आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य जगन्नाथ कोरडे,माजी सरपंच ईश्वरलाल बाकलीवाल,सुनीलराव बाकलीवाल,भारत गवळी,उद्योजक सुभाष दिघे,संदीप सुडके, सागर गाडेकर,रामभाऊ जाधव,राजेंद्र सुडके, प्रकाश पांडव,संजय जाधव,योगेश जाधव,स्वागत चव्हाण, स्वाती चव्हाण,सृष्टी चव्हाण,सहर्ष चव्हाण,सुवर्णा डावखर,मंदा मुळे,लता मुळे प्रणव आहेर,सचिन मुळे, अण्णा मुळे, रावसाहेब मुळे, ज्ञानेश्वर डावखर,उदय डावखर,रमेश काळे,सोनू फिरोदिया,प्रकाश गांधी,उदय सभारंजक, बाळासाहेब कदम,महेश उघडे,यश कुताळ, गजानन गवारे, गंगाधर रासने,किशोर गोरे,दादा झावरे सुभाष हंडाळ, विष्णुपंत जाधव,रामभाऊ देवरे, काना सोनवणे,नारायण चने,श्रावण लकारे, दिनेश पुलाटे ज्ञानेश्वर डावखर उदय डावखर बाबा आरगडे उपस्थित होते.

## भाजप नेते हरिशभाई बच्छाव पक्षातून निलंबित

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

जिल्ह्याच्या राजकारणात खळबळ डांग जिल्ह्यातील भाजपचे माजी जिल्हा पंचायत सदस्य तसेच जिल्हा पंचायत सिंचन समितीचे माजी अध्यक्ष हरिभाई बच्छाव यांना पक्षविरोधी कारवाया आणि शिस्तभंगाच्या आरोपांमुळे भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वातून निलंबित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे डांग जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा आणि खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुजरात प्रदेश भाजप अध्यक्षांच्या निर्देशानुसार डांग जिल्हा भाजप अध्यक्ष किशोरभाई एम. गावित यांनी हरिशभाई बच्छाव यांच्या निलंबनाचा अधिकृत आदेश जारी केला आहे. संबंधित पत्र ८ जून २०२६ रोजी जारी करण्यात आल्याचे समोर आले आहे.हरिशभाई बच्छाव हे डांग जिल्ह्यातील भाजपचे प्रभावशाली आणि वजनदार नेते मानले जातात. ते सलग दोन कार्यकाळ जिल्हा पंचायत सदस्य म्हणून निवडून आले होते. तसेच जिल्हा पंचायतच्या कृषी व सिंचन समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते.

अलीकडेच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आहवा-२ जिल्हा पंचायत मतदारसंघातून त्यांच्या कुटुंबातील सदस्य श्रद्धाबेन तुषारभाई खरे यांना मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून देत त्यांनी आपला प्रभाव सिद्ध केला होता.राजकीय वर्तुळात हरिशभाई बच्छाव यांचा आहवा-१, आहवा-२ आणि वघई जिल्हा पंचायत मतदारसंघांमध्ये मजबूत प्रभाव असल्याचे मानले जाते. अशा प्रभावशाली नेत्याविरोधात पक्षाने केलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईमुळे भाजपमधील गटबाजी आणि अंतर्गत मतभेदांबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे.

## आळंदी माऊली मंदिरास राज्यपाल आर्लेकर यांची सदिच्छा भेट



आळंदी : (स. गांवकरी)

केरळ आणि तामिळनाडूचे प्रभारी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी संत श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरास सदिच्छा भेट देत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे अधिकमास मध्ये दर्शन घेतले. या वेळी त्यांनी श्रींची पूजा करून माऊलींच्या चरणी दर्शन घेत नतमस्तक झाले. श्रींचा कृपाशीर्वाद त्याची या भेटी मध्ये घेतले. या वेळी पुणे प्रमुख जिल्हा व पुणे जिल्हा सत्र न्यायाधीश अरविंद पी. वानखेडे यांचेसह आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड. रोहिणी पवार यांच्या हस्ते राज्यपाल आर्लेकर यांचा श्री ज्ञानेश्वरी, पुष्पहार, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात झाला. या प्रसंगी आळंदीचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, व्यवस्थापक माऊली वीर, माजी विश्वस्त डॉ. अभय टिळक, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील, नगरसेवक आदित्य घुंडरे, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, संत सोपानकाका संस्थान सासवडचे त्रिगुण महाराज गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आळंदी नगरपरिषद नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांचे हस्ते वारकरी शिल्प भेट देऊन समस्त ग्रामस्थ आळंदी यांचे हस्ते राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांचा आळंदी ग्रामस्थ यांचे वतीने विशेष सत्कार झाला. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर त्यांच्या पत्नी अनघा आर्लेकर यांच्या हस्ते चैतन्य फाउंडेशन गोवा यांनी भारतीय कालगणने नुसार तयार केलेल्या विशेष दिनदर्शिका माऊलींच्या चरणी अर्पण करून दिनदर्शिकेचे करंजा मंडपात प्रकाशन करण्यात आले. या भेटी प्रसंगी सुरू असलेला अधिक मास आळंदीतील धार्मिक आणि आध्यात्मिक विशेष कालावधीचे महत्त्व याचा विचार करू वारकरी भाविकांत अचानक भेटी मुळे परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या मुळे अनेक भाविकांना, व्यापारी यांना गैरसोयीस सामोरे जावे लागले. पुढील वर्षी ही या दिनदर्शिकेचे प्रकाशन येथे व्हावे. अशी अपेक्षा राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी व्यक्त केली.

## श्रीमद्भागवत आणि भगवद्गीता हे अमूल्य आध्यात्मिक वैभव

- भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज
- अधिक मासाच्या अखेरच्या सप्ताहात श्रीमद्भागवत कथा सार ग्रंथ निरूपणास भक्तिमय प्रारंभ

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



अधिक मासाच्या अखेरच्या सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद्भागवत कथा सार ग्रंथ निरूपण सोहळ्याला अत्यंत भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री काळेश्वर मंदिरात दर्शन घेऊन मंजुळ स्वरातील भजन, नामसंकीर्तन आणि शोभायात्रा काढण्यात आली. या मंगलमय वातावरणामुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

या भागवत सप्ताहाच्या यजमानपदाचा लाभ श्री संतोष रसाळ व सौ. सुखदा रसाळ यांना लाभला. त्यांच्या हस्ते श्रीमद्भागवत ग्रंथाचे पूजन तसेच निरूपणकार भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज (छत्रपती संभाजीनगर) यांचे विधिवत स्वागत व पूजन करण्यात आले. धार्मिक विधी वे. ना. उमेश वाळुंजकर व बंडोपंत धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

यावेळी आपल्या निरूपणात भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज म्हणाले की, "श्रीमद्भागवत हा ग्रंथ मनुष्याचे जीवन आणि त्याचा शेवट किती मंगलमय, यशस्वी व मोक्षदायी होऊ शकतो, याचे उत्कृष्ट दर्शन घडवितो. राजा परीक्षिताच्या जीवनातून हे सत्य स्पष्टपणे समोर येते. रामायण आपल्याला आदर्श संसार कसा करावा हे शिकवते, तर महाभारत जीवनातील संघर्ष, कर्तव्य आणि धर्माचे तत्त्वज्ञान समजावून सांगते. रामायण आणि महाभारत ही भारतीय संस्कृतीची ओळख आहेत, तर श्रीमद्भागवत आणि भगवद्गीता हे भारतीय संस्कृतीचे अमूल्य आध्यात्मिक वैभव आहे."

पुढे ते म्हणाले की, "या ग्रंथांचे चिंतन अत्यंत एकाग्रचित्ताने करणे आवश्यक आहे. त्यासाठी इंद्रियसंयम, मनावर नियंत्रण आणि ईश्वरभक्ती आवश्यक आहे. राजा परीक्षिताने आपल्या आचरणातून हे जगासमोर सिद्ध करून दाखविले आहे." निरूपणादरम्यान गोकर्ण आख्यानाचे प्रभावी आणि रसाळ विवेचन करण्यात आले. या आख्यानाने उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. भागवत कथा सार निरूपणामुळे अधिक मास अधिक फलदायी, पुण्यदायी आणि आध्यात्मिकदृष्ट्या परिपूर्ण होत असल्याची भावना उपस्थित भक्तांमध्ये व्यक्त होत होती. संपूर्ण अधिक मासभर विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संगीत गुरुचरित्र पारायण, नारदीय कीर्तन, अभ्यासपूर्ण प्रवचने, गीता मंडळाच्या वतीने श्री ज्ञानेश्वरी पारायण, तसेच विविध धार्मिक ग्रंथांचे सामूहिक वाचन यांचा समावेश होता. एवढेच नव्हे तर दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत श्रीविष्णुसहस्रनाम पठण, पूजन, विष्णुयाग व इतर धार्मिक विधी नियमितपणे पार पडत होते.

## ज्ञानसंपदा शाळेत सु-मन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



बुधवार दि. 10 जून 2026 रोजी ज्ञानसंपदा शाळेत शिक्षक प्रशिक्षणांतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शिक्षकांशी सुसंवाद साधण्यात आला. डॉ. जयंत कुलकर्णी हे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत तसेच डी. इ .एस, पुणे विद्यापीठात शिक्षण विद्या शाखा प्रमुख आहेत. यांनी शिक्षण पद्धतीतील अत्यंत तर्कशुद्ध विचार मांडत, शैक्षणिक पार्श्वभूमी ,बदलत्या शिक्षण पद्धतीत अध्यापन करताना बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे, यावर भर दिला... ऐतिहासिक दृष्टिकोनः स्वातंत्र्यपूर्व शिक्षण, तेव्हाची व्हा शिक्षणाचीची गरज, त्या काळात उभ्या राहिलेल्या समाजसुधारकांचे व शाळांचे योगदान यावर विस्तृत चर्चा केली. स्वातंत्र्यानंतरचे बदलः स्वातंत्र्यानंतर बदललेली शिक्षणाची गरज, सामाजिक परिस्थिती व सरकारी धोरणे याविषयी प्रसंगकथनाच्या माध्यमातून सखोल संवाद झाला. विद्यार्थी-केंद्रित अध्यापनः विद्यार्थ्यांना भावनिक स्तरावर समजून घेणे, त्यांच्यातील कौशल्ये ओळखणे व राष्ट्रभक्ती निर्माण करणे हे साचेबद्ध अध्यापनाने शक्य नाही. यासाठी विद्यार्थ्यांना प्रयोगशील बनवणे अधिक आवश्यक आहे, यावर एकमत झाले. सध्याच्या अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी सामाजिक समस्या व त्यानुसार सतत प्रयोगशील असण्याची गरज यावर अर्थपूर्ण संवाद साधला गेला.

# आ. संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त विकासकामांची भेट

### प्रभाग क्रमांक २ मधील परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध : नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक 2 मध्ये नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त संदेशनगर व परिसरातील चौक सुशोभीकरण,श्रीराम चौक ते वसंत टेकडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पेव्हिंग ब्लॉक बसवून सुशोभीकरण अशा विविध विकास कामाचा शुभारंभ नगरसेविका रोशनी ताई त्रंबके यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या विकासकामामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. या प्रसंगी नगरसेवक निखिल वारे, महेश



तवले, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, विनीत पाऊलबुधे, आकाश त्र्यंबके, सुजाता शिंदे,सुरेखा बनकर, राजश्री पिंपळे, भास्कर चेमटे,किशोर वाणे,महेश टाक, गोरक्षनाथ आव्हाड, वैभव पोकळे, विद्याधर कुलकर्णी, प्रकाश कलंके, दत्तात्रय जरे, कृष्णा आंधळे धीरज उकिरडे, देविदास गुडा, अमर मेट्टू, विकी करोलिया सचिन लोटके तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभागातील रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि मूलभूत विकासकामांना प्राधान्य देत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. श्रीराम चौक ते वसंत टेकडी हा परिसर दाट लोकवस्तीचा असून या रस्त्याच्या सुशोभीकरणामुळे वाहतुकीची सुविधा सुधारण्याबरोबरच परिसर अधिक आकर्षक आणि सुस्थितीत दिसणार आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरात विविध विकासकामे वेगाने मार्गी लागत असल्याचेही उपस्थितांनी नमूद केले.

शुभारंभ प्रसंगी बोलताना नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके म्हणाल्या की, आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांना विकासकामांची भेट देणे हीच त्यांना खरी शुभेच्छा ठरणार आहे. यावेळी नगरसेवक निखिल वारे म्हणाले शहराच्या प्रत्येक भागात दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, रस्ते सुस्थितीत राहावेत आणि नागरिकांचे जीवनमान उंचावावे यासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील डॉ. सुजय विखे पाटील, आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक 2 मध्ये अनेक विकासकामे हाती घेण्यात आली असून भविष्यातही नागरिकांच्या गरजांनुसार विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. संदेश नगर चौक सुशोभीकरण, त्याच बरोबरच रोजगार उपलब्ध होण्यासाठी चौपाटी करण्याचा आमचा मानस आहे. असे वारे यांनी सांगितले. बाळासाहेब पवार आपल्या भाषणात म्हणाले की, विकास हा केवळ आश्वासनांचा विषय नसून तो प्रत्यक्ष कृतीतून दिसला पाहिजे. नागरिकांनी दाखविलेला विश्वास आणि सहकार्य यामुळेच विविध कामे मार्गी लागत आहेत. प्रभागातील प्रत्येक रस्ता, गटार, पाणीपुरवठा आणि सुशोभीकरणाच्या कामांमध्ये गुणवत्ता राखण्यास प्राधान्य दिले जाणार असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही 4 ही नगरसेवक सदैव उपलब्ध राहू. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांचे परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# श्री क्षेत्र भीमाशंकर येथे मुख्यमंत्री यांची भेट देत पाहणी





(स. गांवकरी)

श्री क्षेत्र भीमाशंकर येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते शनिवार ता. १३ जून रोजी भीमाशंकर मंदिरासमोरील सभामंडपावर स्थापित करण्यात येणाऱ्या ब्रह्मध्वजाचे पूजन तसेच सभामंडपाच्या शिखरावरील मुख्य दगड (की-स्टोन) पूजन संपन्न झाले.

त्यानंतर विकास आराखड्याची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी भीमाशंकर मंदिर आणि परिसराचा विकास अधिक प्रभावीपणे कसा करता येईल, याबाबत सविस्तर चर्चा केली. भाविकांच्या सोयी-सुविधा, पर्यावरणीय संवेदनशीलता आणि स्थानिकांच्या हिताचा समतोल राखत विकासकामांना गती देण्यावर यावेळी विशेष भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याचबरोबर आदर्श ग्राम योजनेअंतर्गत प्रस्तावित पुनर्वसन स्थळाची पाहणी केली. या प्रकल्पाचे सादरीकरण जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले. तसेच नवीन भक्तनिवास, प्रसाधनगृह, निगडाळ येथील वाहनतळ, आरोग्य केंद्र आणि पोलीस चौकीच्या कामांचाही आढावा घेण्यात आला. श्री क्षेत्र भीमाशंकरचा विकास करताना भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि स्थानिकांच्या हिताचे जतन करणे, हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगत या विकास आराखड्याला पूर्ण पाठबळ देत भाविकांच्या सोयी-सुविधांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी खेड-आळंदीचे आमदार बाबाजी काळे, भोसरीचे आमदार महेश लांडगे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश कौदरे आणि भीमाशंकर देवस्थानचे उपकार्यकारी विश्वस्त मधुकर गवांदे उपस्थित होते.

घोडेगाव येथील हरिश्चंद्र मंदिर येथे मुख्यमंत्र्यांचे स्वागत - भीमाशंकरला जाताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा घोडेगाव ता. आंबेगाव येथील तीर्थक्षेत्रे श्री हरिश्चंद्र महादेव संस्थान मंदिराच्या प्रवेशद्वारावर देवस्थानच्या वतीने शाल व प्रतिमा भेट देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष प्रशांत काळे, कोषाध्यक्ष राजेश काळे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस डॉ.ताराचंद कराळे, प्रमोद बाणखेले, किरण पोखरकर, अशोक गाभाले, रविंद्र कर्पे,भगवान भागवत इ. उपस्थित होते. याप्रसंगी देवस्थानला विकास कामांसाठी निधीची मागणी देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नैसर्गिक शेती व मृदा आरोग्य विषयक मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

गंगापूर बुद्रुक (स. गांवकरी) : केंद्र सरकारच्या "खेत बचाव" अभियानांतर्गत गंगापूर बुद्रुक येथे ग्रामपंचायत कार्यालयात नैसर्गिक शेती, मृदा आरोग्य आणि शाश्वत कृषी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाअंतर्गत भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर) यांच्या अधिपत्याखालील केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, माटुंगा (मुंबई) येथील प्रधान शास्त्रज्ञ डॉ. अशोककुमार भारीमल, शास्त्रज्ञ डॉ. कनिका शर्मा, मुख्य तांत्रिक अधिकारी शरदराव कोकणे तसेच माहिती अधिकारी सौ. प्राची म्हात्रे उपस्थित होते. यावेळी डॉ. अशोककुमार भारीमल यांनी जमिनीचे आरोग्य, नैसर्गिक शेतीचे आर्थिक व आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व, पीक नियोजन तसेच शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या अर्थसहाय्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. कनिका शर्मा यांनी माती परीक्षणाचे महत्त्व, रासायनिक खतांचा मर्यादित वापर आणि शाश्वत शेती पद्धतींबाबत माहिती दिली. तर शरदराव कोकणे यांनी जीवामृत, घन जीवामृत, जैविक कीटकनाशके आणि नैसर्गिक शेतीतील विविध तंत्रज्ञान यांची सखोल माहिती शेतकऱ्यांना दिली.

### दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू; एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : तालुक्यातील पोखर्डी- पिंपळगाव उज्जैनी मार्गावर भरधाव वेगातील दुचाकीच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. बाळू नारायण गाडेकर (रा. श्रीरामनगर, पिंपळगाव उज्जैनी रस्ता, पोखर्डी, ता. अहिल्यानगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महादेव भाऊसाहेब जाधव (रा. पिंपळगाव उज्जैनी) असे गुन्हा दाखल झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. शुभम शिवाजी जाधव (वय २२, रा. पोखर्डी) यांनी गुरुवारी (११ जून) फिर्याद दिली आहे. बुधवारी (१० जून) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास पोखर्डी ते पिंपळगाव उज्जैनी जाणाऱ्या रस्त्यावर मुसेवस्ती परिसरात हा अपघात झाला. महादेव जाधव हा त्याच्या ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने चालवत होता. यावेळी रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याने समोरून येणारे बाळू गाडेकर यांना जोरदार धडक दिली. या अपघातात बाळू गाडेकर गंभीर जखमी झाले व त्यांचा मृत्यू झाला. अपघात घडल्यानंतर चालकाने जखमी व्यक्तीला मदत न करता तसेच पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरून पळ काढल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. एमआयडीसी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### अन्न-औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे ॲक्शन मोड'मध्ये

कनाशी (स. गांवकरी) : अन्न व औषध प्रशासन विभागाचे कर्तव्यदक्ष आयुक्त तुकाराम मुंढे यांची बदली होताच त्यांनी कारवाईचा बडगा उचलण्यास सुरुवात केली आहे. त्याचे पडसाद कळवण तालुक्यातही उमटताना दिसत आहेत. राज्यात गुटखाबंदी असूनही छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्यांवर आता थेट मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश आयुक्त मुंढे यांनी जारी केले आहेत. संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून गुटखा विक्री होत असल्यास संबंधितांवर मोक्का लावला जाणार आहे. या आदेशामुळे कळवण तालुक्यातील अवैध गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना बळजबरीने त्याच रुग्णालयातील मेडिकलमधून औषधे घेण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. याची गंभीर दखल घेत आयुक्त मुंढे यांनी स्पष्ट आदेश काढला आहे. जर कोणतेही रुग्णालय रुग्णाला विशिष्ट मेडिकलमधूनच औषधे घेण्यास सक्ती करत असेल, तर त्या रुग्णालयावर कारवाई केली जाईल. रुग्णाला कोणत्याही नोंदणीकृत मेडिकलमधून औषधे घेण्याचा अधिकार आहे. तुकाराम मुंढे हे शिस्तप्रिय काम आणि कायद्याची कडक अंमलबजावणी करणारे 'दबंग अधिकारी' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जातात. त्यांनी जिथे-जिथे काम केले, तिथे भ्रष्टाचार व अनियमिततेला चाप लावला आहे. अन्न-औषध प्रशासनात येताच त्यांनी मिलावटखोर, मुदतबाह्य औषध विक्रेते आणि नियम धाब्यावर बसवणाऱ्या रुग्णालयांविरोधात मोहीम उघडली आहे.

### मुख्याध्यापकपदी सौ. वैशाली देशमुख पावडे यांची पदोन्नती



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी हायस्कूल, सिडको, नवीन नांदेड येथे उपमुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या सौ. वैशाली देशमुख पावडे यांची संस्थेच्या वतीने मुख्याध्यापक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. सौ. वैशाली देशमुख पावडे ह्या संस्कृत विषयाच्या अध्यापिका असून त्यांनी यापूर्वी सावित्रीबाई फुले हायस्कूल बाबा नगर येथे तीस वर्षापासून संस्कृत विषयाचे उत्कृष्ट अध्यापन केले असून त्यानंतर त्यांची सेवा जेष्ठतेनुसार महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर विजयनगर येथे पर्यवेक्षक या पदी पदोन्नती करण्यात आली. त्या उत्कृष्ट अध्यापिका, विद्यार्थीप्रिय शिक्षिका तसेच उत्तम प्रशासिका म्हणून सुपरिचित आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, उपाध्यक्षा माजी आमदार सौ अमिताभाभी चव्हाण, सचिव माजी राज्यमंत्री डी.पी. सावंत, सहसचिव माजी प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर, कार्यकारणी सदस्य आमदार श्रीजयाताई चव्हाण, सुजयाताई चव्हाण, नरेंद्रदादा चव्हाण, पांडुरंगराव पावडे तसेच शालेय समितीचे अध्यक्षा सौ श्वेता पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### उपमुख्याध्यापकपदी डॉ. अण्णा गरड यांची पदोन्नती



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी हायस्कूल, सिडको, नवीन नांदेड येथे पर्यवेक्षक म्हणून कार्यरत असलेले डॉ. अण्णा गरड यांची संस्थेच्या वतीने यांची महात्मा फुले स्कूल बाबानगर विजयनगर येथे उपमुख्याध्यापक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. डॉ. अण्णा गरड हे मागील 30 वर्षापासून इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नवीन नांदेड येथे भूगोल विषयाचे अध्यापन कार्य करीत असून त्यांची इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नवीन नांदेड येथे सेवाजेष्ठतेनुसार पर्यवेक्षक पदी निवड करण्यात आली होती विद्यार्थीप्रिय शिक्षक तसेच उत्तम प्रशासक म्हणून सुपरिचित आहेत.

## जि. प. सदस्या नेहाताई पाटे यांची अध्यक्षपदी निवड



खोडद : (स. गांवकरी)

दिनांक 11 जून 2026 रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वारूळवाडी येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या जन आरोग्य समितीची महत्त्वपूर्ण सभा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत महत्त्वाचा निर्णय घेत मा. सौ नेहाताई योगेश पाटे जिल्हा परिषद सदस्या पुणे, यांची जन आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली .तसेच या समितीमध्ये पंचायत समिती सदस्या जयश्रीताई बनकर, सुषमाताई वाव्हळ यांचीही सदस्य म्हणून निवड करण्यात आली.त्यामुळे समिती अधिक सक्षम व सर्वसमावेशक झाली आहे.

या बैठकीसाठी नारायणगाव, वारूळवाडी, खोडद, मांजरवाडी, हिवरे, गुंजाळवाडी येथील सरपंच तसेच स्थानिक मान्यवर उपस्थित होते. बैठकीमध्ये दवाखान्याच्या एकूण कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रमुख विषयांवर चर्चा झाली.

## कृषी महाविद्यालय सरळगावचा ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम उत्साहात सुरू; नांदगाव येथे कृषी युवा गटाचे आगमन

ठाणे : (स. गांवकरी)




ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी आणि त्यांच्या शेती व्यवस्थापनात सुधारणा व्हावी, या उद्देशाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संलग्न आणि ठाणे शैक्षणिक संकुल संचलित कृषी महाविद्यालय सरळगावच्या वतीने ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम उत्साहात सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाचा 'कृषी युवा गट' नुकताच नांदगाव येथे दाखल झाला आहे. गावात आगमन झाल्यानंतर या कृषी युवा गटाने सर्वप्रथम स्थानिक ग्रामपंचायतीला भेट दिली. यावेळी त्यांनी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक आणि शेतकरी बांधवांशी सविस्तर संवाद साधून आगामी उपक्रमांची रूपरेषा मांडली. हे विद्यार्थी पुढील १२ आठवडे नांदगावमध्ये राहून विविध माध्यमांतून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. या १२ आठवड्यांच्या कालावधीत आधुनिक शेती, तंत्रज्ञान व्यवस्थापन आणि शेतीपूरक व्यवसायांवर विशेष भर दिला जाणार आहे. या अंतर्गत गावात शेतकरी मेळावे, शेतीविषयक तज्ज्ञांची व्याख्याने, शिवार फेरी, कृषी प्रदर्शन आणि रानभाज्यांचे प्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेषतः शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणारे माती परीक्षण आणि त्याची थेट प्रात्यक्षिके करून दाखवण्यावर विद्यार्थ्यांचा भर असणार आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना जमिनीच्या सुपीकतेची अचूक माहिती मिळू शकेल. हा महत्त्वपूर्ण उपक्रम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. सी. सरोदे आणि गट मार्गदर्शक प्रा. डी. एल. पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व गावातील सरपंच-उपसरपंचांच्या उपस्थितीत राबवला जात आहे. या संपूर्ण उपक्रमात कृषी युवा गटातील सहकारी विद्यार्थी ओमकार झुगरे, सुजल शिंदे, रोशन लायगुडे, सुरज जाधव, मनीष पाटील, रोहित भांगरे, विश्वजीत साठे, श्लोक काटकर आणि शाओलिन कांबळे हे परिश्रम घेत आहेत. या उपक्रमामुळे नांदगाव परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे धडे मिळणार असून, त्यांच्यात सध्या उत्साहाचे वातावरण आहे.

## २५ वृक्षांचे वृक्षारोपण करून अनोखा संदेश देण्याचा प्रयत्न

इगतपुरी : (स. गांवकरी)



गेल्या दोन ते तीन वर्षांपासून विकास कामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोडी झाल्यामुळे यावर्षी राज्यात उन्हाळ्यात ऊष्णतेचा पारा वाढल्याने नागरिकांना श्वास घेणे असह्य झाल्याचे पाहावयास मिळाले. सध्या जिकडे पाहावे तिकडे वृक्षतोड करून सिमेंटचे जंगल उभे राहिले आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावणे किती महत्वाचे आहे हे आता मानवाच्या लक्षात आले आहे. याच पार्श्वभुमीवर इगतपुरीतील समाजसेवक संजय थोरात यांनी माणिकखांब ता.इगतपुरी येथे आपले वडिल सुरेश थोरात यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त २५ वृक्षांचे वृक्षारोपण करून एक वेगळाच संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात भरपूर झाडे लाऊन त्यांचे संगोपन करावे असे मनोगत थोरात यांनी यावेळी व्यक्त केले. सद्याची परिस्थिती पाहता वाढती उष्णता ही सर्वांसमोरची गंभीर समस्या आहे. यावर प्रभावी उपाय म्हणजे वृक्षारोपण. प्रत्येकाने झाडे लावून त्यांचे मनापासून संगोपन करावे व ती जगवावीत. पर्यावरण संवर्धनासाठी हा एक छोटासा पण महत्त्वाचा प्रयत्न आहे असे मनोगत बौद्धाचार्य मनोज मोरे यांनी वृक्षारोपण प्रसंगी व्यक्त केले. तर सामाजिक कार्यकर्ते एन. के. सोनवणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे.

झाडे मानवी जीवनाचा आणि पर्यावरणाचा मुख्य आधार आहेत. ती हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन शुद्ध ऑक्सिजन देतात, ज्यामुळे हवामान बदल व प्रदूषणाचा सामना करणे शक्य होते. याशिवाय झाडे पाणी जमिनीत मुरवून जमिनीची धूप थांबवतात आणि जैवविविधतेचे रक्षण करतात.

मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी हिरवीगार झाडे आणि निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याने ताणतणाव कमी होतो. मानवी आरोग्यासाठी आणि आनंदी वातावरणासाठी झाडे अत्यंत फायदेशीर आहेत. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे असा संदेश सामाजिक कार्यकर्ते भिमराव पंडित यांनी या प्रसंगी दिला.

माणिकखांब येथे वृक्षारोपण प्रसंगी निसर्गप्रेमी बंटी पगारे,बौद्धाचार्य मनोज मोरे, सामाजिक कार्यकर्ते एन. के. सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते भिमराव पंडित, संजय थोरात, पोलीस पाटील उत्तम शिवराम पगारे, लोकराज्य प्राईम न्यूजचे संपादक सुनील पगारे, प्रतिक पगारे, चेतन पगारे, अनुराग पगारे आदी उपस्थित होते.

## श्रीमद्भागवत ग्रंथ ज्ञान, भक्ती आणि कर्माला दिशा देणारा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



अधिकमासानिमित्त आयोजित श्रीमद्भागवत कथा सप्ताहात ग्रंथ निरूपण करताना ह.भ.प. भागवत महाराज दळवी यांनी श्रीमद्भागवत ग्रंथाचे महत्त्व विशद केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, "श्रीमद्भागवत हा ग्रंथ ज्ञानाने परिपूर्ण, भक्तीरसाने ओतप्रोत भरलेला आणि मनुष्याच्या कर्माला योग्य दिशा दाखवणारा आहे. या ग्रंथाचे चिंतन, मनन व आचरण केल्याने मानवाचा आध्यात्मिक उद्धार होतो." महाराजांनी भागवतामधील विविध प्रसंगांचे दाखले देत जीवनमूल्ये स्पष्ट केली. कपिलमुनींनी आपल्या मातेला आत्मबोध करून तिचा उद्धार केला, हा प्रसंग सांगताना त्यांनी माता-पित्यांच्या सेवाभावाचे महत्त्व अधोरेखित केले. "आई-वडिलांची सेवा ही भारतीय संस्कृतीची अनादि परंपरा आहे. त्यांच्या सेवेसह ग्रंथवाचन, सत्संग आणि भगवंताचे स्मरण यांमुळे जीवनाचा शेवट गोड, मंगलमय आणि सार्थक होतो," असे त्यांनी नमूद केले. त्यानंतर ध्रुवाच्या चरित्राचे वर्णन करताना त्यांनी सांगितले की, लहान वयातच ध्रुवाने नारदमुनींच्या कृपेने 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा अखंड जप करीत कठोर तपश्चर्या केली आणि भगवंतांना प्रसन्न करून अढळ पद प्राप्त केले. या प्रसंगातून एकाग्रचित्ताने केलेले नामस्मरण जीवन परिपूर्ण करते, असा संदेश त्यांनी दिला.

# इगतपुरी त्र्यंबक तालुक्यात राब भाजणीची लगबग

### खरीप पूर्व मशागत अंतिम टप्प्यात : शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत

इगतपुरी : (स. गांवकरी)



इगतपुरी तालुक्यात पावसाळा तोंडावर आल्याने आणि खरिपाची तयारी सुरू झाल्याने महाराष्ट्रातील भात व नागली उत्पादक पट्ट्यांत म्हणजेच मावळ, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर पट्ट्यात राब भाजणीची लगबग जोरात सुरू आहे. आदिवासी भागात भात आणि नागलीच्या उत्तम उत्पादनासाठी पेरणीपूर्वी शेतातील जमिनीत सुका पालापाचोळा, झाडांच्या फांद्या ,उसाचे पाचट ,गव्हाचा भुसा व गोवऱ्या जाळून जमीन भाजण्याची (राब) ही पारंपरिक शेती पद्धत आहे या पद्धतीने शेतकऱ्यांना खरीप हंगामातील भाताचे व इतरत्र बी बियाणांची रोपे तयार करण्यास मोठी मदत होते.या राब भाजणीच्या कामाला इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागात सध्या जोरदार सुरुवात झाली असून खरीप हंगामाची पूर्व मशागत अंतिम टप्प्यात आली असून बळीराजा सध्या पावसाची वाट बघतो आहे.

राब भाजणीचे महत्त्व आणि फायदे : तण नियंत्रण : जमिनीवरील गवत व तणांचे बीज जळून नष्ट होतात. जमिनीचा पोत सुधारतो : जमिनीची उष्णता वाढून ती भुसभुशीत होते आणि पिकांची वाढ चांगली होते. उत्तम उगवण: बियाण्यांची उगवणक्षमता वाढून भाताची रोपे (रोपे किंवा कांडी) सशक्त तयार होतात. पर्यावरणपूरक पद्धत: शेतकरी सहसा वृक्षांची कत्तल न करता उपलब्ध गवत आणि सुक्या फांद्यांचाच वापर करतात.ही शेती मशागतीची अतिशय महत्त्वाची पूर्वतयारी असून, अचानक येणाऱ्या अवकाळी पावसाचा फटका बसू नये म्हणून शेतकरी सध्या कोरड्या हवामानात हे काम वेळेत पूर्ण करत आहेत. सध्या इगतपुरी तालुक्यात सर्वत्रच खरीप हंगामाची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात आली असून, शेतकरी आता दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मशागत, बियाणे आणि खते खरेदी करून शेतकरी सज्ज झाले आहेत, मात्र मृग नक्षत्र उजाडूनही पाऊस न बरसल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत. कृषी विभागाने पुरेसा पाऊस झाल्याशिवाय घाईघाईने पेरणी करू नये, असा सल्ला शेतकऱ्यांना दिला आहे.पाऊस पडल्याशिवाय कोणीही पेरण्या करू नये असा सल्ला तालुका कृषी अधिकारी रामदास मडके यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना दिला आहे.खरीप हंगामाच्या सद्यस्थितीबद्दल शेतकऱ्यांनी शेताची नांगरणी, वखरणी, बांधबंदिस्ती,राब भाजणी यासारखी कामे पूर्ण केली आहेत. तसेच लागणारे भात,सोयाबीन,खुरासनी इतर पिकांचे बियाणे आणि खते बाजारातून आणून ठेवण्यात आली आहेत.कृषी विभागाचा सल्ला: हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पेरणीयोग्य पाऊस (साधारण १०० मिलिमीटरपेक्षा जास्त) झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. मान्सूनपूर्व पावसाच्या किंवा ढगाळ वातावरणाच्या भरवशावर पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते.

नैऋत्य मान्सूनच्या आगमनाकडे संपूर्ण बळीराजाचे डोळे लागून आहेत. काही जिल्ह्यांमध्ये मान्सूनपूर्व सरी किंवा हलका पाऊस पडला असला, तरी अजूनही अनेक भागात शेतकरी जोरदार पावसाची वाट पाहत आहेत.अशी सध्या पावसाची स्थिती असल्यामुळे सध्या बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत आहे.